**गोपनीय**

क्र.मुंमप्रविप्रा/बैठक/१२७

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : २१ ऑक्टोबर, २०१०.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २६ ऑगस्ट, २०१० (गुरुवार) रोजी झालेल्या १२७ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

सन्माननीय सदस्यांनी याबाबतीत काही हरकती असल्यास कृपया कळवाव्यात ही विनंती.

सचिव,
कार्यकारी समिती

प्रति,

सर्व सदस्य व निमंत्रित

प्रत अग्रेषित :-

विधी सल्लागार, मुं.म.प्र.वि.प्रा.

प्राधिकरणाचे अधिकारी

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १२७ व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | २६ ऑगस्ट, २०१०. (गुरुवार) |
| वेळ | : | दुपारी २.३० वाजता |
| सभास्थान | : | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,<br>समिती कक्ष, ६ वा मजला,<br>वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१. |

**उपस्थित सदस्य :**

| | |
|---|---|
| श्री.अशोक चव्हाण<br>माननीय मुख्यमंत्री | अध्यक्ष |
| श्री.भास्कर जाधव<br>नगर विकास राज्यमंत्री | सदस्य |
| श्रीमती श्रध्दा जाधव<br>मुंबईच्या महापौर | सदस्या |
| श्री.राहूल शेवाळे<br>अध्यक्ष, स्थायी समिती,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.राजहंस सिंह धनंजय सिंह<br>नगरसेवक,बृहन्मुंबई महानगरपालिका<br>आणि विधानसभा सदस्य | सदस्य |
| श्री.आशिष बाबाजी शेलार<br>नगरसेवक,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.नवाब मलिक<br>विधानसभा सदस्य | सदस्य |
| श्री.प्रशांत रामशेठ ठाकूर<br>विधानसभा सदस्य | सदस्य |

| | |
|---|---|
| श्री.जे.पी.डांगे<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | सदस्य |
| श्री.टी.सी.बेंजामिन<br>प्रधान सचिव,<br>नगर विकास विभाग<br>महाराष्ट्र शासन | सदस्य |
| श्री.स्वाधीन क्षत्रिय<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.सीताराम कुंटे<br>सचिव,<br>गृहनिर्माण विभाग,<br>महाराष्ट्र शासन | सदस्य |
| श्री.रत्नाकर गायकवाड<br>महानगर आयुक्त | सदस्य-सचिव |

<u>निमंत्रित</u> :

श्री.रमेश जाधव
महापौर,
कल्याण-डोंबिवली महानगरपालिका

श्री.सागर नाईक
महापौर,
नवी मुंबई महानगरपालिका

श्रीमती नूरजहाँ यासिन शेख
नगराध्यक्षा,
खोपोली नगरपरिषद

श्री.संतोष शृंगारपुरे
नगराध्यक्ष,
पेण नगरपरिषद

श्री.शरद लक्ष्मण लाड
नगराध्यक्ष,
कर्जत नगरपरिषद

श्री.कपिल पाटील
अध्यक्ष,
ठाणे जिल्हा परिषद

श्री.मनुकुमार श्रीवास्तव
सचिव,
नगर विकास विभाग
महाराष्ट्र शासन

बैठकीच्या सुरुवातीस, प्राधिकरणाने श्री.पुष्पकांत म्हात्रे, माजी अध्यक्ष, स्थायी समिती, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे दिनांक २२ एप्रिल, २०१० रोजी, श्री.सदाशिवराव तिनईकर, माजी सचिव, गृहनिर्माण विभाग यांचे दिनांक २२ मे, २०१० रोजी, श्री.नरेंद्र तिडके, माजी उद्योग मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे दिनांक १६ जून, २०१० रोजी आणि श्री.मधुकरराव चौधरी, माजी वित्त मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे दिनांक ८ जुलै, २०१० रोजी झालेल्या दुःखद निधनाबद्दल शोक व्यक्त केला व सदस्यांनी एक मिनिट स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली वाहिली. त्यानंतर, श्री.म्हात्रे, श्री.तिनईकर, श्री.तिडके व श्री.चौधरी यांच्या निधनाबद्दलच्या शोक ठरावांस (जोडपत्रे १, २, ३ व ४) प्राधिकरणाने मंजूरी दिली.

त्यानंतर, श्री.रत्नाकर गायकवाड, महानगर आयुक्त व प्राधिकरणाचे सदस्य-सचिव यांनी श्री.राहूल शेवाळे, अध्यक्ष, स्थायी समिती, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे प्राधिकरणाचे पदसिध्द सदस्य म्हणून प्राधिकरणाच्या बैठकीस प्रथमच उपस्थित रहात असल्याने त्यांचे स्वागत केले. तसेच श्री.सागर नाईक, महापौर, नवी मुंबई महानगरपालिका हे प्राधिकरणाचे पदसिध्द “स्थायी निमंत्रित” म्हणून प्राधिकरणाच्या बैठकीस प्रथमच उपस्थित रहात असल्याने त्यांचेही स्वागत केले.

त्यानंतर, प्राधिकरणाचे महानगर आयुक्त व सदस्य-सचिव यांनी श्री.वसंत डावखरे, माजी उप-सभापती, विधानपरिषद, श्री.रविंद्र वायकर, माजी अध्यक्ष, स्थायी समिती, बृहन्मुंबई महानगरपालिका, श्री.जी.एस.गील व श्री.एस.एस.हुसेन, माजी व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी

प्राधिकरणाचे सदस्य म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेबद्दल गौरवपूर्ण उल्लेख केला. तसेच श्रीमती अंजनी भोईर, माजी महापौर, नवी मुंबई महानगरपालिका यांनी प्राधिकरणाचे "स्थायी निमंत्रित" म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचाही गौरवपूर्ण उल्लेख केला.

त्यानंतर, विषयपत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : दिनांक ९ फेब्रुवारी, २०१० रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (१२६ व्या) बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : दिनांक ९ फेब्रुवारी, २०१० रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (१२६व्या) बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

२.१ कार्यवाही अहवालाची नोंद घेताना खालील बाबींवर चर्चा करण्यात आली :-

**बाब क्र.८ : बृहन्मुंबई महानगरपालिका व मिरा - भाईंदर महानगरपालिका यांच्या क्षेत्रातील उत्तन - गोराई - मनोरी अधिसूचित क्षेत्रासाठी प्रारुप मनोरंजन व पर्यटन विकास आराखडा, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम २६ अन्वये जनतेकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी प्रसिध्द करण्याबाबत....**

या विषयावर चर्चा करताना गोराई-मनोरी-उत्तन या अधिसूचित क्षेत्राच्या विकास योजना जनतेकडून सूचना व हरकती मागविण्याकरीता प्रसिध्द करताना उपस्थित झालेल्या कायदेशिर अडचणीबाबत महानगर आयुक्त यांनी खुलासा केला. तसेच शासनाच्या विधी व न्याय विभागाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या तरतूदीप्रमाणे सदर क्षेत्रासाठी विकास योजना तयार करण्याचा इरादा पुनःश्च प्रसिध्द करण्याचा अभिप्राय देण्याची शक्यता असल्याचे स्पष्ट केले. यावर मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी विधी व न्याय विभागाने तसा अभिप्राय दिल्यास इरादा पुनःश्च प्रसिध्द करण्यास प्राधिकरणाची मंजूरी त्यासाठी गृहित धरुन महानगर आयुक्तांनी पुढील कार्यवाही करावी असे सर्वानुमते ठरले.

**बाब क्र.१३ : मुंबई महानगर प्रदेशातील पूर्व उप-प्रदेशाच्या पाणी पुरवठयात सुधारणा घडविण्यासाठी काळू धरणाचा विकास.**

या विषयावर चर्चा करताना प्राधिकरणाचे सदस्य श्री.आशिष शेलार, नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी काळू धरणाचा विकास कामाच्या निविदाबाबत कोंकण पाटबंधारे विकास यांनी काय कार्यवाही केली याची विचारणा केली. त्यासंदर्भात महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांनी काळू धरणाच्या बांधकाम कंत्राटाबाबत फेर वाटाघाटी करुन बांधकामाची सुधारित किंमत अंदाजित रक्कमेवर ४% आधिक्याने नक्की केल्याचे कळविण्यात आले आहे. त्यामुळे काळू धरणाच्या बांधकामाची सुधारित किंमत रु.४३८.४५ कोटी इतकी येते. त्यावर सदस्यांनी प्राधिकरणातर्फे केलेल्या प्रयत्नामुळे कंत्राटाची किंमत रु.१७२ कोटींनी कमी झाल्याबाबत समाधान व्यक्त केले व यावरील चर्चेत सदर प्रस्तावास मान्यता देण्यात आली. तसेच मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी पाणी पुरवठा प्रकल्पाबाबत असे निर्देश दिले की, पाणीपुरवठा प्रकल्प राबविताना संपूर्ण मुंबई महानगर क्षेत्राचा विचार व्हावा आणि डिसॅलीनेशन व सांडपाण्याचा पुनर्वापर यासारख्या प्रकल्पाचाही विचार करुन त्याप्रमाणे निश्चित कार्यक्रम बनवावा.

२.२ त्यानंतर, कार्यवाही अहवालाची नोंद प्राधिकरणाने घेतली.

**बाब क्र.३ : वडाळा भारवाहक तळातील भूखंड क्र.ब्लॉक-सी भाडेपट्टयाने वाटप करण्याबाबत.**

**३.१** सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, वडाळा भारवाहक तळ उभारण्यासाठी शासनाने प्राधिकरणास वडाळा येथील मोकळी जमीन १९९७ मध्ये ९९ वर्षांसाठी भाडेपट्ट्यावर ताब्यात दिली.

**३.२** त्यानंतर शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) च्या कलम ४०(१)(सी) नुसार प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन वडाळा भारवाहक तळाच्या अधिसूचित क्षेत्राच्या नियोजनासाठी "मुंबई

महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची" (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त प्राधिकरण" असा करण्यात आला आहे) विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून शासनाच्या दिनांक ३ डिसेंबर, २००५ रोजीच्या अधिसूचनेन्वये नेमणूक केली आहे.

३.३ प्राधिकरणाने उक्त अधिनियमांच्या कलम ४० (३) (डी) प्रमाणे वडाळा भारवाहक तळ, आंतरराष्ट्रीय बस वाहन तळ, अनुषंगिक सुविधा आणि पायाभुत सुविधा या अधिसुचित क्षेत्राच्या विकासासाठी या क्षेत्राचे सर्वेक्षण करुन प्रारुप नियोजन प्रस्ताव आणि प्रारुप विकास नियंत्रण विनियमावली तयार केली आहे. या नियोजन प्रस्तावामध्ये ग्लोबल चटई क्षेत्र निर्देशांक ४ इतका प्रस्तावित केला आहे.

३.४ सदर नियोजन प्रस्ताव आणि प्रारुप विकास नियंत्रण नियमावलीकरिता दिनांक १५ ऑक्टोबर, २००८ रोजी झालेल्या १२३ व्या बैठकीमध्ये सदर प्रस्ताव ठेऊन प्राधिकरणाची मंजूरी घेण्यात आली. त्यानुसार उक्त अधिनियमाच्या कलम ४० (३) (डी) अन्वये जनतेच्या सूचना व हरकती मागविण्यासाठी नोटीस प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानंतर सदर प्रस्ताव दिनांक १६ नोव्हेंबर, २००९ रोजी शासनास मंजूरीसाठी सादर केला आहे. शासनाची मंजूरी लवकरात लवकर येणे अपेक्षित आहे.

३.५ शासनास सादर केलेल्या नियोजन प्रस्तावानुसार आंतरराष्ट्रीय वाहनतळ - वाणिज्य भूखंड (CI-Zone) म्हणून अशी एकूण १३.८५ हेक्टर जागा राखीव ठेवण्यात आली आहे. तद्नंतर आंतरराष्ट्रीय वाहनतळ - आयकॉनिक टॉवरसाठी निविदा मागविली होती, त्यावेळी एकही निविदा प्राप्त झाली नाही.

३.६ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, वडाळा भारवाहक तळामधील भूखंड क्र.ब्लॉक-सी या वाणिज्य वापराचा भूखंड भाडेपट्टयाने आयकॉनिक टॉवर या प्रकल्पाकरिता वाटप

करण्यासाठी वेगळी निविदा दिनांक ३ मार्च, २०१० रोजी मागविण्यात आली होती. या निविदेमध्ये नमूद केलेल्या भूखंडाचे क्षेत्र, अनुज्ञेय वापर व अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र इत्यादी तपशील पुढील तक्त्यात दिला आहे :-

| भूखंड क्र. | भूखंडाचे क्षेत्रफळ (चौ.मी.) | अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र (चौ.मी.) | अनुज्ञेय वापर | राखीव अधिमूल्य (रुपये) |
|---|---|---|---|---|
| ब्लॉक-सी | २५,०००.०० + ६७,६०० मोकळी जागा | ४,९५,०००.०० | कमर्शियल ऑफिसेस / बिझनेस सेन्टर / शॉपिंग मॉल्स, स्टार हॉटेल्स ॲन्ड रेस्टॉरंट, एन्टरटेनमेंट सेंटर, हेल्थ, स्पोर्टस् फॅसिलिटिज् ॲन्ड रेसिडेंशिअल. | रु.५०,०००/- प्रति चौ.मी. बांधकाम क्षेत्र |

**३.७** सदर निविदा प्रक्रियेच्या संदर्भात दिनांक २५ मार्च, २०१० रोजी निविदाकारांची निविदा पूर्व बैठक घेण्यात आली होती. निविदाकारांच्या विनंतीवरुन आणि सक्षम स्पर्धा होण्याच्या दृष्टीकोनातून निविदेमधील काही अटी शिथील करण्यात आल्या. (i) बोलीदाराने २०० मीटरवरुन १०० मीटर एवढी करुन त्यापेक्षा कमी नसलेल्या उंचीची इमारत बांधलेली / पूर्ण केलेली असावी. (ii) अधिमूल्याचा राखीव दर रु. ५०,०००/- वरुन रु. ४०,०००/- प्रति चौ.मी. बांधकाम क्षेत्र एवढा करण्यात आला होता. निविदा जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या अटींमध्ये सुधारणा केल्याप्रमाणे वर्तमानपत्रामध्ये दिनांक २० एप्रिल, २०१० रोजी शुद्धीपत्रक प्रसिद्ध करण्यात आले होते. निविदा जमा करण्याचा व निविदा उघडण्याचा कालावधी दिनांक २३ एप्रिल, २०१० वरुन दिनांक २५ मे, २०१० पर्यंत वाढविण्यात आला होता. निविदाकारांच्या विनंतीवरुन पुन्हा एक निविदापूर्व बैठक दिनांक ६ मे, २०१० रोजी घेण्यात आली.

**३.८** तसेच अधिमूल्याची रक्कम भरण्यास खालील पर्याय दिले होते. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ मधील नियम क्र.९ प्रमाणे अधिमूल्याची संपूर्ण रक्कम देकार पत्र दिल्यापासून ३ महिन्यांच्या आत भरणे किंवा अधिमूल्याची एकूण रक्कम ५ हप्त्यात १०% व्याजाने (compound interest) राखीव दर रु. ४०,००० प्रती चौ.मी. बांधकाम क्षेत्र

या दराने खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे उदाहरणार्थ भरणे अपेक्षित होते.

| Estd. Cost | Percentage | Amount (Rs. in crores) | Cumulative amount (Rs.in crores) | Interest (Rs. in crores) | Amount + interest (Rs. in crores) |
|---|---|---|---|---|---|
| Upfront | 10% | 198.00 | 198.00 | 0.00 | 198.00 |
| Year 1 | 5% | 99.00 | 297.00 | 13.00 | 112.00 |
| Year 2 | 10% | 198.00 | 495.00 | 42.00 | 240.00 |
| Year 3 | 15% | 297.00 | 792.00 | 103.00 | 400.00 |
| Year 4 | 20% | 396.00 | 1188.00 | 184.00 | 580.00 |
| Year 5 | 40% | 792.00 | 1980.00 | 472.00 | 1264.00 |
| **Total** | | **1980.00** | | | **2794.00** |

**३.९** वरील प्रस्तावावर विश्लेषण करताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाने यापूर्वी वडाळा भारवाहक तळ येथील तसेच वांद्रे-कुर्ला संकुलातील वाणिज्य वापराचा भुखंड भाडेपट्टयावर वाटप करण्यासाठी २००८ मध्ये निविदा मागविली होती. परंतू बाजारातील मंदीमध्ये सुधारणा झाली नसल्यामुळे एकही निविदा प्राप्त झाली नाही. म्हणून प्राधिकरणाने हाती घेतलेल्या नागरी पायाभुत सुविधा प्रकल्पाला लागणारा निधी लक्षात घेता प्राधिकरणाने उत्तम प्रकारची निविदा प्राप्त व्हावी म्हणून वरील दिलेल्या तक्त्यामध्ये अधिमुल्याची रक्कम हप्त्यात भरण्याचे तसेच वाणिज्य ऐवजी CI-झोनमध्ये अनुज्ञेय असलेले सर्व वापर अनुज्ञेय करण्याचे प्रस्तावित केले.

**३.१०** निविदा स्वीकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत ४ निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी मे.लोढा क्राऊन बिल्डमार्ट प्रायव्हेट लिमिटेड या निविदाकाराने पर्याय-२ निवडून त्यांनी रु.८१,८१८.१८ प्रती चौ.मी. बांधकाम क्षेत्र या सर्वोच्च दराने खाली दिलेल्या तक्त्याप्रमाणे अधिमूल्याची रक्कम भरण्यास तयारी दर्शविली आहे :-

| Estd. Cost | Percentage | Amount (Rs. in crores) | Cumulative amount (Rs.in crores) | Interest (Rs. in crores) | Amount + interest (Rs. in crores) |
|---|---|---|---|---|---|
| Upfront | 10% | 405.00 | 405.00 | 0.00 | 405.00 |
| Year 1 | 5% | 202.50 | 607.50 | 20.25 | 222.75 |
| Year 2 | 10% | 405.00 | 1012.50 | 85.05 | 490.05 |
| Year 3 | 15% | 607.50 | 1620.00 | 201.08 | 808.58 |
| Year 4 | 20% | 810.00 | 2430.00 | 375.92 | 1185.92 |
| Year 5 | 40% | 1620.00 | 4050.00 | 989.03 | 2609.03 |
| **Total** | | **4050.00** | | **1671.33** | **5721.33** |

वरील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे एकूण अधिमूल्याच्या रकमेपैकी १०% रक्कम स्विकारुन, ६५

वर्षांचा भाडेपट्टा करार करण्यास व उर्वरित अधिमूल्याची रक्कम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ (सुधारित १९९७) मधील नेहमीच्या सर्व प्रमाणभूत अटी व शर्तींनुसार आणि उक्त विनियमाच्या विनियम १६ नुसार प्राप्त अधिकारांचा वापर करुन प्राधिकरणाने नियम क्र.९ शिथिल करुन व्याजासह वरील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे सर्वोच्च पात्र निविदाकाराला भरण्यास मान्यता द्यावी, असे प्रस्तावित केले आहे. तसेच भाडेपट्टा करार किंवा भाडेपट्टा विलेखामध्ये नमूद केलेले बांधकाम पूर्ण करण्याचा कालावधी ४ वर्षांवरुन ५ वर्षे करण्यास मान्यता द्यावी, असे प्रस्तावित केले आहे.

**३.११** सदर प्रस्तावाच्या जोडपत्र-२ ची छापील प्रत ही अपूर्ण छापील असल्यामुळे त्याची पूर्ण छापील प्रत बैठकीच्या वेळी देण्यात आली असल्याचे महानगर आयुक्त यांनी सांगितले.

**३.१२** निविदाकार मे.लोढा क्राऊन बिल्डमार्ट प्रा.लि. यांनी निविदेमधील दिलेल्या पात्रतेच्या अटींची पूर्तता केली असल्यामुळे त्यांना सर्वोच्च निविदाकार समजून निविदाकाराची ९२,६०० चौ.मी. (२५,००० चौ.मी. वाणिज्य वापरासाठी अधिक ६७,६०० चौ.मी. मोकळी जागा) क्षेत्रफळाच्या भूखंडासाठी (यावरील अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र ४,९५,००० चौ.मी.) प्राप्त झालेली रु. ४,०५० कोटी व्याजासह रु. ५,७२१.३३ कोटी एवढया एकूण अधिमूल्याची निविदा स्वीकारण्यात यावी व सदर भूखंड सर्वोच्च पात्र निविदाकारास वाटप करण्याचे प्रस्तावित केले आहे.

**३.१३** श्री.भास्कर जाधव, राज्यमंत्री, नगर विकास विभाग यांनी वरील तक्त्यात नमूद केलेली अधिमूल्याची रक्कम हप्त्याहप्त्याने भरण्याबाबतचा प्रस्ताव आहे. या संदर्भात असे मत व्यक्त केले की, निविदाकाराने एकूण अधिमूल्याच्या रकमेपैकी पहिला हप्ता हा रु. ४०५ कोटी भरल्यानंतर त्याला प्राधिकरणाची जमीन ताब्यात देण्यात येईल. परंतू उर्वरित अधिमूल्याची रक्कम ही ५ वर्षांच्या हप्त्यात भरण्यास निविदाकाराला देणे हे जोखमीचे आहे.

**३.१४** प्राधिकरणाचे सदस्य श्री.आशिष शेलार, नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी याबाबत असे सुचविले की, निविदाकाराने सिव्हिल एव्हिऐशन, हाय राईज कमिटी, पर्यावरण विभागाचा ना-हरकत दाखला इत्यादी सर्व परवानग्या निविदाकारास प्राप्त करुन घ्याव्या लागणार आहेत. सदर परवानग्या प्राप्त करुन घेण्यासाठी वेळ लागणार असल्यामुळे निविदेमधील अधिमूल्याची रक्कम हप्त्यात भरण्यास प्रस्तावित केले.

**३.१५** मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी अशी विचारणा केली की, या भूखंडावर किती चटई क्षेत्र अनुज्ञेय आहे. याबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, शासनाची मंजूरी मिळविण्यासाठी सादर केलेल्या नियोजन प्रस्तावामध्ये ग्लोबल चटई क्षेत्र निर्देशांक ४ इतका नमूद केला आहे. या भूखंडावर एकूण ४,९५,००० चौ.मी. एवढे बांधकाम क्षेत्र अनुज्ञेय केले आहे.

**३.१६** महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, या प्रस्तावातील ठरावामध्ये नमूद केलेले, ज्या सर्वोच्च निविदाकारास निविदेमध्ये नमूद केलेल्या सर्व अटीं व शर्तीसह वाणिज्य वापरासाठी वाटप करण्यास मान्यता देत आहेत, त्याऐवजी या सर्वोच्च निविदाकारास निविदेमध्ये नमूद केलेल्या सर्व अटीं व शर्तीसह निविदेमध्ये दिलेल्या वापरासाठी वाटप करण्यास मान्यता देत आहे, असे वाचण्यात यावे.

**३.१७** सदर भूखंडाच्या वाटपाबाबत सविस्तर चर्चा होऊन सर्वानुमते असे ठरले की, सर्वोच्च पात्र निविदाकार मे. लोढा क्राऊन बिल्डमार्ट प्रा. लि. यांची सर्वोत्तम निविदा स्वीकारुन विषयांकित भूखंड वाटप करण्यात यावा.

**३.१८** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील प्रस्ताव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र.१२३९</u> :**

“**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे उपकलम (२) तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट ) विनियम, १९७७ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे वडाळा भारवाहक तळाच्या शासनास सादर केलेल्या नियोजन प्रस्तावाच्या मंजूरीस अधिन राहून भूखंड क्र.ब्लॉक-सी (CI-Zone) (एकूण अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र ४,९५,००० चौ. मी.) मे. लोढा क्राऊन बिल्डमार्ट प्रा. लि. यांनी भरलेल्या सर्वोच्च दराने म्हणजे रु.८१,८१८.१८ प्रति चौ.मी. बांधकाम क्षेत्र या दराने निविदेतील अटी व शर्ती नुसार सर्वोच्च निविदाकारास खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे एकूण अधिमूल्याच्या रक्कमे पैकी १०% रक्कम स्वीकारुन, ६५ वर्षाच्या भाडेपट्टयाने भाडेपट्टा करार करण्यास व उर्वरित अधिमुल्याची रक्कम मुंबई महानगर प्रदेश विकास ..११/-

प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ (सुधारीत १९९७) मधील नेहमीच्या सर्व प्रमाणभूत अटी व शर्तीनुसार आणि उक्त विनियमाच्या विनियम १६ नुसार प्राप्त अधिकारांचा वापर करुन प्राधिकरणाने विनियम ९ शिथिल करुन सदर रक्कम व्याजासह खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे ५ वर्षात स्वीकारुन उक्त विनियमाच्या विनियम ८ प्रमाणे भूखंडाचे वाटप करण्यास तसेच उक्त विनियमाच्या अटी व शर्तीनुसार तसेच या सर्वोच्च निविदाकारास निविदेमध्ये नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तीसह निविदेमध्ये दिलेल्या वापरासाठी वाटप करण्यास (CI झोनप्रमाणे) मान्यता देण्यात येत आहे :-

| Estd. Cost | Percentage | Amount (Rs. in crores) | Cumulative amount (Rs.in crores) | Interest (Rs. in crores) | Amount + interest (Rs. in crores) |
|---|---|---|---|---|---|
| Upfront | 10% | 405.00 | 405.00 | 0.00 | 405.00 |
| Year 1 | 5% | 202.50 | 607.50 | 20.25 | 222.75 |
| Year 2 | 10% | 405.00 | 1012.50 | 85.05 | 490.05 |
| Year 3 | 15% | 607.50 | 1620.00 | 201.08 | 808.58 |
| Year 4 | 20% | 810.00 | 2430.00 | 375.92 | 1185.92 |
| Year 5 | 40% | 1620.00 | 4050.00 | 989.03 | 2609.03 |
| **Total** | | **4050.00** | | **1671.33** | **5721.33** |

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वडाळा भारवाहक तळाच्या नियोजन प्रस्तावास मंजूरी प्राप्त होताच निविदाकारास देकार पत्र देण्यास व भाडेपट्टा करार किंवा भाडेपट्टाविलेखामध्ये नमूद केलेले बांधकाम पुर्ण करण्याचा कालावधी ४ वर्षावरुन ५ वर्ष करुन सदर भूखंड वाटप करण्यास तसेच भूखंडाच्या एकूण अधिमूल्याच्या १०% रक्कम सर्वोच्च पात्र निविदादाराने प्राधिकरणास जमा केल्यानंतर सदर भाडेपट्टा करार करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** उक्त विनियमाच्या प्रपत्र "ड" (भाडेपट्टाविलेखाचा नमुना) आणि भाडेपट्टा करारामध्ये योग्य ते बदल करुन तसेच सदर भूखंडाच्या बांधकाम प्रकल्पाला लागणारा निधी उभारण्यासाठी शासन मान्यता प्राप्त वित्तीय संस्था आणि बँकेकडून कर्ज घेण्याकरीता केलेल्या गहाणपट्टयास "प्रथम हस्तांतरण" समजले जाणार नाही. तथापि, भाडेपट्टादारास सदर गहाणपट्टा प्रक्रिया करण्याअगोदर महानगर आयुक्त यांची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील अशी सुधारित अट भाडेपट्टा करार आणि भाडेपट्टाविलेखामध्ये अंतर्भूत करुन

या बाबतीत संबंधित निविदाकाराबरोबर भाडेपट्टाकरार आणि भाडेपट्टाविलेख करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

**"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.४ : वांद्रे-कुर्ला संकुलातील "जी-एन" ब्लॉकमधील निविदाकाराने अधिमूल्याची रक्कम वेळेत न भरलेल्या रक्कमेवर व्याज आकारण्याबाबत.**

४.१ या प्रस्तावाबाबत महानगर आयुक्तांनी थोडक्यात माहिती देताना असे सांगितले की, सदरहू प्रस्ताव हा "जी-एन" ब्लॉकमधील "एसएफ-६" हा शैक्षणिक सार्वजनिक प्रयोजनार्थ वापराच्या भूखंडाशी संबंधित आहे. निविदेद्वारे प्राप्त सर्वोच्च पात्र निविदाकार तालीम रिसर्च फाऊंडेशन यांची निविदा स्विकारुन प्राधिकरणाने भूखंड वाटप करण्यास मान्यता दिल्याप्रमाणे सदर भूखंड वाटपास देकार दिला होता. त्यानुसार प्राधिकरणास रु.९२.०० कोटी इतके अधिमूल्य एकूण ३ महिन्यात मिळणे अपेक्षित होते.

४.२ निविदाकाराने अधिमूल्याच्या रक्कमेच्या ५०% इतकी रक्कम (रु.४५,१०,००,०००/-) पहिला हप्ता म्हणून दिनांक १० डिसेंबर, २००८ रोजी प्राधिकरणाला भरणा केली. निविदाकाराने अधिमूल्याच्या रक्कमेची उर्वरीत ५०% रक्ककम (रु.४६,००,००,०००/-) ही वेळेत भरता येणार नाही त्यामुळे ती भरणा करण्याकरीता वेळ मागितला व त्यांनी ही उर्वरीत रक्कम व्याजासह भरण्यास Undertaking (वचन) दिले. निविदाकाराची विनंती स्विकारुन त्यांना उर्वरीत रक्कम व्याजासह मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ च्या नियम क्र.९ अन्वये महानगर आयुक्तांनी स्वेच्छाधीन शक्तींचा वापर करुन दिली आहे. त्याप्रमाणे निविदाकाराला कळविले होते.

४.३ निविदाकाराने सदर उर्वरीत अधिमूल्याची रक्कम रु.४६,००,००,०००/- दिनांक १० नोव्हेंबर, २००९ रोजी प्राधिकरणास भरणा केली आहे. निविदाकाराने उर्वरीत रक्कमेच्या व्याजाची रक्कम प्राधिकरणास भरणा केली नव्हती. त्यामुळे त्यांना दिनांक २३ नोव्हेंबर, २००९ रोजीच्या

पत्राद्वारे १४% या व्याजाच्या दराने म्हणजे रु.४,७९,९१,२३३/- एवढी व्याजाची रक्कम भरण्यास कळविले होते.

४.४ जागतिक आर्थिक मंदीमुळे तसेच स्थावर जमिनीच्या बाजाराची परिस्थिती कोलमडलेली असल्यामुळे अधिमूल्याच्या उर्वरीत रक्कमेवर आकारण्यात आलेल्या व्याजास सूट मिळावी अशी विनंती निविदाकाराने केली आहे.

४.५ जागतिक आर्थिक मंदीच्या परिस्थितीत अजूनही सुधारणा झालेली नसल्यामुळे निविदाकार तालीम रिसर्च फाऊंडेशन यांनी कळविल्यानुसार त्यांची सध्याची आर्थिक स्थिती लक्षात घेता अधिमूल्याच्या रक्कमेवर ठराव क्र.४४ अन्वये ठरविलेले १४% दराने व्याज आकारावे किंवा अतिरिक्त बांधकाम क्षेत्राच्या वाटपग्रहींनी अधिमूल्य वेळेवर भरणा न केल्यास त्यांना आकारावयाचे दंडनीय व्याज हे प्राधिकरणाच्या ठराव क्र.१२०५ अन्वये राष्ट्रीयकृत बँकेच्या PLR नुसार व्याज आकारावे किंवा अधिमूल्याच्या रक्कमेवर प्राधिकरण ठरवेल त्या व्याजाच्या दराने व्याज आकारावे असे ठरविण्याचे प्रस्तावित केले होते.

४.६ त्यांच्या या विनंती संदर्भात एक प्रस्ताव प्राधिकरणाच्या दिनांक ९ फेब्रुवारी, २०१० रोजी झालेल्या १२६ व्या बैठकीत ठेवण्यात आला होता. या बैठकीमध्ये असे ठरले की (ठराव क्र.१२३७) निविदाकाराने अधिमुल्याची पुर्ण रक्कम प्राधिकरणास भरणा केली असल्यामुळे निविदाकाराकडून विलंबाने भरलेल्या अधिमुल्याच्या रक्कमेवरील १४% या व्याजाच्या दराने व्याज आकारण्यात यावे. त्यानुसार निविदाकारास दिनांक १९ एप्रिल २०१० रोजीच्या पत्राद्वारे व्याजाची रक्कम भरणा करण्याचे कळविले होते.

४.७ तालीम रिसर्च फाऊंडेशन यांनी त्यांच्या दिनांक ६ मे, २०१० रोजीच्या पत्रामध्ये मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांना असे कळविले आहे की, फार कठीण परिस्थितीत उर्वरित ५०% रक्कम दिनांक १० नोव्हेंबर, २००९ रोजी भरणा केली. आम्ही तुमच्या निर्दशनास आणू इच्छितो की, प्राधिकरणाने आम्हाला आता व्याज भरण्याचे कळविले आहे. आम्हाला असे समजले

आहे की, प्राधिकरणाने आमच्यासारख्या एका प्रकरणी सनटेक रिॲलिटी यांना विलंबाने भरलेल्या अधिमूल्याच्या रक्कमेवर व्याज भरण्यास मुभा दिली आहे. त्यांची वाणिज्य व्हेंचर आहे आणि आमची शैक्षणिक संस्था आहे. म्हणून शिक्षण हे प्राधान्य क्रमाचे सेक्टर असल्याने प्राधिकरणास निर्देश दयावे की, आमची विनंती पुन्हा तपासून व्याजाची रक्कम भरण्यास मुभा मिळावी अशी विनंती आहे.

**४.८** प्राधिकरणाच्या १२६व्या बैठकीमध्ये (ठराव क्र.१२३६ अन्वये) ठरल्याप्रमाणे, निवासी भूखंड क्र.आर-१.४ हे निविदाकार स्टारलाईट सिस्टीमस् प्रा. लि. यांना दिनांक १ ऑक्टोबर, २००९ ते ३० नोव्हेंबर, २००९ पर्यंत अधिमूल्याच्या ५०% रक्कम भरण्यास व उर्वरीत ५०% रक्कम भरण्याची मुभा पुढील १२ महिन्यापर्यंत वाढविण्यास दिलेल्या परवानगीस कार्योत्तर मान्यता दिली आहे. तसेच सदर निविदाकारास वेळेत न भरलेल्या अधिमूल्याची रक्कम व्याजाची आकारणी न करता भरण्यास मान्यता दिली आहे.

तसेच सदर निविदाकाराने अधिमूल्याची रक्कम नोव्हेंबर, २००९ अखेर पर्यंत न भरल्यामुळे भूखंड क्र.आर.१.१ च्या वाटपाबाबत सदर निविदाकारास दिनांक ३१ मार्च, २०१० पर्यंत अधिमूल्याच्या ५०% रक्कम व उर्वरीत ५०% रक्कम १२ महिन्यापर्यंत म्हणजेच दिनांक १ डिसेंबर, २००९ ते दिनांक ३० नोव्हेंबर, २०१० पर्यंत भरण्यास मान्यता दिली आहे. तसेच सदर निविदाकारास वेळेत भरना न केलेल्या अधिमूल्याची रक्कम व्याजाची आकारणी न करता भरण्यास मान्यता दिली आहे.

**४.९** जागतिक आर्थिक मंदीच्या परिस्थितीत अजूनही सुधारणा झाल्याचे दिसून येत नसल्यामुळे आणि तालीम रिसर्च फाऊंडेशन यांनी कळविल्यानुसार त्यांची सध्याची आर्थिक स्थिती लक्षात घेता अधिमूल्याच्या रक्कमेवर ठराव क्र.७४४ अन्वये ठरविलेले १४% दराने व्याज आकारावे किंवा अतिरिक्त बांधकाम क्षेत्राच्या वाटपग्रहींनी अधिमूल्य वेळेवर भरणा न केल्यास त्यांना आकारावयाचे दंडनीय व्याज हे ठराव क्र.१२०५ अन्वये ठरविल्याप्रमाणे राष्ट्रीयकृत बँकेच्या PLR नुसार व्याज आकारावे असे ठरविण्यासाठी पुन्हा एकदा प्राधिकरणास विनंती केली किंवा प्राधिकरण ठरवेल त्या व्याजाच्या दराने निविदाकाराकडून व्याज आकारले जाईल, असे प्रस्तावित केले.

**४.१०** प्राधिकरणाचे सदस्य श्री.आशिष शेलार, नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी असे विचार व्यक्त केले की, मागील बैठकीत तालीम रिसर्च फाऊंडेशनला उर्वरित ५०% रक्कमेवर व्याज आकारण्यात आले पण त्याच बैठकीत निवासी भूखंड आर.१.१ व आर.१.४ च्या वाटपाबाबत निविदाकार स्टारलाईट सिस्ट्म्स प्रा. लिमिटेडला वेळेत भरणा न केलेल्या अधिमूल्याची रक्कम भरण्यास व्याज आकारण्यात आले नाही. ते पुढे म्हणाले की, जागतिक आर्थिक मंदीमुळे सध्या वांद्रे-कुर्ला संकुलामधील वाणिज्यिक उपयोगाच्या भूखंडांच्या विक्रीस योग्य प्रतिसाद नाही. तसेच "एसएफ-६" हा शैक्षणिक प्रयोजनार्थ वापराचा भूखंड असल्यामुळे व मागील बैठकीत निवासी भूखंड आर.१.१ व आर.१.४ त्यांना उर्वरित रकमेवर व्याज न आकारण्याचे धोरण लक्षात घेऊन तालीम रिसर्च फाऊंडेशनला वाटप केलेला शैक्षणिक प्रयोजनार्थ भूखंडासाठी विलंबाने भरलेल्या अधिमूल्याच्या रक्कमेवर व्याज आकारु नये.

**४.११** या विषयावर चर्चा करताना मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी असे सुचविले की, यापूर्वीही व्याजाची रक्कम न भरण्याची मुभा दिली आहे. तसेच तालीम रिर्सच फांऊडेशन ही शैक्षणिक संस्था असल्यामुळे त्यांनाही व्याजाची रक्कम न भरण्याची सुट द्यावी, जेणेकरुन समान धोरण असावे, त्यामुळे तालीम रिर्सच फांऊडेशनला व्याज भरण्याची सुट देण्यास हरकत नसावी. सदर भूखंडाच्या वाटपाबाबत सविस्तर चर्चा होऊन सर्वानुमते असे ठरले की, वांद्रे-कुर्ला संकुलातील "जी-एन" ब्लॉकमधील भूखंड क्र.एसएफ-६ हा शैक्षणिक सार्वजनिक प्रयोजनार्थ वापराचा भूखंड असल्यामुळे निविदाकार तालीम रिसर्च फाऊंडेशन यांनी वेळेत भरणा न केलेल्या अधिमूल्यावर व्याजाची आकारणी न करण्यास मान्यता देण्यात यावी.

**४.१२** त्यानंतर, प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. १२४० :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे उपकलम (२) तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे वांद्रे-कुर्ला संकुलातील

"जी-एन" ब्लॉकमधील भूखंड क्र.एसएफ-६ हा शैक्षणिक सार्वजनिक प्रयोजनार्थ वापराचा भूखंड असल्यामुळे निविदाकार तालीम रिसर्च फाऊंडेशन यांनी वेळेत भरणा न केलेल्या अधिमूल्यावर व्याजाची आकारणी न करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ अन्वये पुढील आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.५ : वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमधील भूखंड क्र.आरजी-२ वरील प्रस्तावित विकासासाठी विकास नियंत्रण नियमावलीतील फेरबदलामुळे उपलब्ध (अनुज्ञेय) झालेले बांधकाम क्षेत्र मुंबई क्रिकेट असोसिएशनला वाटप करताना आकारावयाच्या अधिमूल्याबाबत.**

**५.१** या प्रस्तावाबाबत महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमधील भूखंड क्र.आरजी-२ हा मुंबई क्रिकेट असोसिएशन यांना प्राधिकरणाच्या दिनांक १७ मे, २००१ रोजी झालेल्या १००व्या बैठकीत पारित केलेल्या ठरावानुसार त्यांच्या इनडोअर क्रिकेट ॲकेडमीच्या विकसनासाठी वाटप केला आहे.

**५.२** शासनाने त्यांच्या दिनांक १२ डिसेंबर, २००८ रोजीच्या अधिसूचनेद्वारे वांद्रे-कुर्ला संकुलातील ५०,००० चौ.मी. पेक्षा जास्त असलेल्या मनोरंजनाची मोकळी जागा किंवा खेळाचे मैदान अशा जमीन वापराच्या भूखंडावरील अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र १५% वरुन २०% व जोत्याचे क्षेत्र १०% वरुन १५% एवढे वाढविले आहे. शासनाच्या दिनांक १२ डिसेंबर, २००८ च्या अधिसूचनेस अनुसरुन अधिक ५% (२६०७.८५ चौ. मी.) अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र मिळावे अशी मुंबई क्रिकेट असोसिएशनने विनंती केली आहे. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मुंबई क्रिकेट असोसिएशन यांना आरजी-२ हा भूखंड इनडोअर क्रिकेट ॲकडमी या शैक्षणिक उपक्रमासाठी वितरीत करताना त्यावेळी अस्तित्वात असलेल्या शाळेच्या वापरासाठीचा दर रु.३,४००/- प्रति चौ.मी. बांधकाम क्षेत्र या दराने भूखंड वाटप केला होता. अलिकडेच निविदेद्वारे प्राप्त झालेला शाळेसाठीचा दर (भूखंड क्र.एसएफ-६)

..१७/-

रु.७७,९६६/- प्रति चौ.मी. बांधकाम क्षेत्र या दराने (निविदेद्वारे रु.१,५५,९३२/- प्रति चौ.मी असा दर २ चटई क्षेत्र निर्देशांक असलेल्या जमिनीसाठी प्राप्त झाला होता) अधिमूल्य आकारण्याचे प्राधिकरणाच्या दिनांक ९ फेब्रुवारी, २०१० रोजी झालेल्या १२६व्या बैठकीमध्ये प्रस्तावित करण्यात आले होते. श्री.जे.पी.डांगे, मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी असे सांगितले की, शासनाच्या महसूल व वन विभागाने जमिनीचे वाटप करतेवेळी कोणते दर आकारावे, अशी अधिसूचना काढली आहे, या अधिसूचनेबाबत सविस्तर चर्चा झाल्यानंतर आरजीच्या भूखंडामधील अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र वाटपाचे धोरण आणि सदर प्रस्तावाबाबतचे दर निश्चित करण्याबाबतच्या धोरणाचा प्रस्ताव पुन्हा सादर करावा, असा प्राधिकरणाने निर्देश दिला होता.

५.३ शासनाच्या महसूल व वन विभागाने प्रसिध्द केलेले परिपत्रक क्र.एलूआर्एफ्-१०८३/ ७११३४/सी-आर-३४७८/जी-६, दिनांक ६ फेब्रुवारी, १९८३ अनुसार "महानगरपालिका क्षेत्रातील जमिनीचे वाटप खाजगी शैक्षणिक संस्थांना खेळाच्या मैदानासाठी बाजारभावाच्या १०% दराने केले जाते. तसेच शाळा किंवा कॉलेज यांची इमारत बांधकामासाठी शासकीय जमिनीचे वाटप बाजारभावाच्या २५% दराने परिपत्रकामध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीवर केले जाते". शासन दरवर्षी रेडी रेकनरचे दर प्रसिध्द करीत असते. शासन शासकीय जमीन ही बाजारभावाने वाटप करीत असते. शासनाच्या या परिपत्रकाप्रमाणे आरजीच्या भूखंडामधील अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र हे बाजारभावाच्या २५% या दराने वाटप करावे असे सांगितले. तसेच पुढे असेही सांगितले की, वांद्रे-कुर्ला संकुलातील "जी", "जीएन" व "जी-टेक्स्ट" ब्लॉकमधील आरजी/खेळाचे मैदानाचे भूखंड वाटप करतेवेळी शासन दरवर्षी रेडी रेकनरचे दर प्रसिध्द करीत असते, त्या रेडी रेकनरमधील जमिनीच्या दराच्या २५% या दराने प्रति चौ.मी. बांधकाम क्षेत्रास अधिमूल्य आकारण्याच्या धोरणाप्रमाणे भूखंड वाटप करण्याचे प्रस्तावित केले आहे असे सांगितले.

५.४ प्राधिकरणाचे सदस्य श्री.आशिष शेलार, नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी असे सूचविले की, मुंबई क्रिकेट असोसिएशन ही मुंबईतील क्रिकेट खेळाशी संलग्न अनेक क्लबची एकत्रित मिळून संस्था बनलेली आहे. तेव्हा त्यांना अशाप्रकारे रेडी रेकनरच्या २५% या दराने प्रती चौ.मी. बांधकाम क्षेत्र या दराने वाटप करताना या सर्व क्लबना या मैदानावरील खेळपट्टीवर खेळण्यास व

सामने भरवण्यास मुंबई क्रिकेट असोसिएशनकडून या मैदानावर प्रवेश मिळावा असे आश्वासन त्यांच्याकडून घ्यावे असे वाटते. याबाबत महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, मुंबई क्रिकेट असोसिएशन सोबत याबाबत चर्चा करण्यात येईल.

५.५ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.१२४१</u> :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** हे प्राधिकरण, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ च्या कलम ३ अन्वये प्राप्त झालेल्या व त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, मुंबई क्रिकेट असोसिएशन या भूखंडधारकास वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमधील भूखंड क्र.आरजी-२ मध्ये विकास नियंत्रण विनियमावलीतील फेरबदलानुसार उपलब्ध झालेले अतिरिक्त बांधकाम क्षेत्र अनुज्ञेय करण्यास व हे अनुज्ञेय क्षेत्र (२६०७.८५ चौ.मी.) मूळ भाडेपट्टाविलेखातील अटी व शर्ती सारख्यांच अटी व शर्तीवर, शासन दरवर्षी रेडी रेकनरचे दर प्रसिध्द करीत असते, त्या रेडी रेकनरमधील निवासी जमिनीच्या दराच्या २५% या दराने प्रति चौ.मी. अतिरिक्त बांधकाम क्षेत्रास अधिमूल्य आकारुन वाटप करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमधील भूखंड क्र.आरजी-२ या भूखंडावरील नव्याने उपलब्ध बांधकाम क्षेत्र, ६७% शिस्तबध्द व खुल्या वापराच्या क्षेत्रामध्ये ५% भूभागावर, ५% चे बांधकाम मूळ भाडेपट्टाविलेखातील अटी व शर्ती सारख्यांच अटी व शर्तीवर अनुज्ञेय करण्याच्या प्रस्तावास प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** "मुंबई क्रिकेट असोसिएशन" यांनी प्राधिकरणास द्यावयाचे तळघर प्राधिकरणास हस्तांतरीत केल्यानंतर, अतिरिक्त बांधकाम क्षेत्रासाठीचे अधिमूल्य भरल्यानंतर व पुरवणी भाडेपट्टाविलेख झाल्यानंतर प्राधिकरण नव्याने उपलब्ध अतिरिक्त बांधकाम क्षेत्रासाठी विकास परवानगी देईल.

**"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** "मुंबई क्रिकेट असोसिएशन" या भूखंडधारकाकडून वर नमूद केल्याप्रमाणे अधिमूल्य वसूल करण्यास पुरवणी भाडेपट्टाविलेख करण्यास, इतर क्लब्स् व संस्थांना मैदानाचा वापर करु देण्याबाबत महानगर आयुक्त ज्या अटी टाकतील त्याप्रमाणे व इतर सर्व अनुषंगित कार्यवाही करण्यास व वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.६ : मुंबई महानगर प्रदेशासाठी M/s.LEA Associates, South Asia Pvt. Ltd., New Delhi यांनी तयार केलेल्या मुंबई महानगर प्रदेशासाठीचा मोनोरेल बृहत् आराखडा आणि निवडक मोनोरेल मार्गाचा प्राथमिक सुसाध्यता अभ्यासाच्या अहवालास मान्यता मिळण्याबाबत.**

६.१ महानगर आयुक्त यांनी या प्रस्तावावर माहिती देताना असे सांगितले की, प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणा-या मेट्रो, उपनगरीय रेल सेवा या सार्वजनिक जलद परिवहन सेवा म्हणून पूरक व सहाय्यभूत व्हाव्या, याकरीता प्राधिकरणाने मोनोरेल प्रकल्पासाठी एक बृहत् आराखडा तयार करण्याकरीता मेसर्स ली असोसिएटस् साऊथ एशिया प्रा. लि., नवी दिल्ली यांची सल्लागार म्हणून प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची मान्यता घेतल्यानंतर नेमणूक करण्यात आली होती.

६.२ मेसर्स ली असोसिएटस् साऊथ एशिया प्रा. लि., नवी दिल्ली यांनी या अगोदर मुंबई महानगर प्रदेशाकरीता जागतिक बँकेच्या सहाय्याने मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत पुढील २५ वर्षांकरीता सर्वंकष परिवहन अहवाल तयार केला.

६.३ मोनोरेल बृहत् आराखडा तयार करण्याकरीता सल्लागाराची व्याप्ती खालीलप्रमाणे आहे :-

- सर्वंकष परिवहन अभ्यासाच्या शिफारसींना अनुसरून मोनोरेलची एक वाहतूक पद्धत म्हणून कार्यक्षमता ओळखणे.

- मुंबई महानगर प्रदेशासाठी मोनोरेल बृहत् आराखडा तयार करणे.
- सर्वंकष परिवहन अभ्यासामध्ये सन २०२१ आणि २०३१ साठी चाचणी केलेल्या प्रवास मागणीचे प्रतीरुप वापरुन मोनोरेल मार्गांच्या निवडक अशा १०० किमी मार्गांवर प्रवासाची मागणी ओळखणे.
- प्राधिकरणाच्या संगनमताने, प्राथमिक सर्व्हेक्षणानुसार पहिल्या १०० किमी निवडक मोनोरेल मार्गांसाठी प्राथमिक सुसाध्यता व तांत्रिक-आर्थिक सुसाध्यता अभ्यास करणे.
- पुढील १० वर्षांत अंमलबजावणी होणाऱ्या मोनोरेल मार्गांचे क्रम ठरविणे.
- निधी उभारण्यासाठी सल्ला देणे, शासन निधी किंवा PPP नमुना इत्यादी.

६.४ बृहत् आराखडा तयार करताना सल्लागाराने खालील निकषांचा विचार केला :-

१) सर्वंकष परिवहन अभ्यासाच्या शिफारशीप्रमाणे बसेससाठी स्वतंत्र धावपट्टया.

२) एकूण बस संख्या ही एकूण वाहतूकीच्या ३% पेक्षा जास्त असल्यास.

३) बस प्रवास मागणी ही दर तासाला दोन्ही दिशेस ३००० किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास.

४) प्रती दिन वाहतूक संख्या ही ५०,००० PCUs पेक्षा जास्त असल्यास.

५) सर्वंकष परिवहन अभ्यासाच्या आधारावर वर्ष २०१० पर्यंत ते मार्ग, की ज्यांच्या दोन्ही दिशेची वाहतूक ही प्रती दिन ५०,००० PCUs पेक्षा जास्त आणि (आवाज/क्षमता) निर्देशांक ०.७ पेक्षा जास्त असल्यास.

६) मुख्य केंद्रे, विकासाची नवी क्षेत्रे, पुनर्विकसित क्षेत्रे यांना जोडणारे रस्ते/मार्ग.

७) तसेच मोनोरेल मार्ग आणि स्थानके यांच्यासाठी २४ मीटर पेक्षा जास्त रुंदी असणारे रस्ते/मार्ग.

६.५ वरील निकषांच्या आधारावर सल्लागाराने मोनोरेल मार्गाचा बृहत् आराखडा तयार केला आणि सदर अभ्यासाकरीता स्थापन केलेल्या तांत्रिक सल्लागार समिती तसेच महानगर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये या प्रस्तावावर चर्चा करण्यात आली. त्याप्रमाणे सल्लागाराने तयार केलेला अंतिम मसुदा अहवाल एप्रिल, २०१० मध्ये सादर करण्यात आला. सदर अहवालानुसार

सल्लागाराने पुढील २०२१ पर्यंत राबविण्यात येणा-या मोनोरेल मार्गांची यादी खालीलप्रमाणे आहे :-

| अनु. क्र. | मोनोरेल मार्ग | लांबी (कि.मी.) | EIRR (%) |
|---|---|---|---|
| १ | ठाणे-भिवंडी-कल्याण | ३०.०० | |
| २ | मुलुंड-बोरीवली | ३०.०० | २६.५० |
| ३ | विरार रेल्वे स्थानक-चिखलडोंगरी रेंटल हौसिंग स्कीम | ४.६० | ४८.०० |
| ४ | लोखंडवाला-सीप्झ-कांजूरमार्ग | १३.१४ | ४५.०० |
| ५ | ठाणे/नौपाडा-मिरा भाईंदर-दहिसर | २४.२५ | २५.८० |
| ६ | कल्याण-उल्हासनगर-डोंबिवली | २६.४० | २८.९० |
| ७ | चेंबूर-घाटकोपर-कोपरखैरणे | १५.७२ | २८.२० |
| ८ | महापे-शिळफाटा-कल्याण | २१.१० | २९.३० |
| | एकूण लांबी | १३५.२१ कि.मी. | EIRR (%) |

वरील मोनोरेल मार्गांचा प्राथमिक सुसाध्यता अहवालानुसार १३५.२१ कि.मी लांबीचा एकूण अंदाजित खर्च रु.२०२९५४ दशलक्ष इतका आहे.

**६.६** महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्तावावर विचार करुन सल्लागाराने तयार केलेल्या बृहत् आराखडयास मान्यता द्यावी अशी विनंती केली. सदर प्रस्तावावर प्राधिकरणाचे सदस्य श्री.आशिष शेलार, नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी असे सांगितले की, मोनोरेलच्या उन्नत मार्गासाठी विस्तृत खर्च हा प्रती कि.मी. १३९० दशलक्ष तसेच खाडी / खारफुटी क्षेत्रातून उन्नत मार्गाचा विस्तृत खर्च हा प्रती कि.मी ५५६० दशलक्ष असा नमूद करण्यात आला. वरील खर्च लक्षात घेता या प्रस्तावावर सल्लागारांनी शिफारस केलेले वरील सर्व मार्ग राबविण्याची आवश्यकता आहे काय? अशी विचारणा केली.

**६.७** याबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, जगात कुठेही Public Transport System Commercial viable होत नसून त्याला शासनाचे अनुदान काही प्रमाणात देणे आवश्यक आहे. तसेच या सर्व मार्गांचा स्वतंत्रपणे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केल्यानंतर सार्वजनिक खाजगी सहभाग (PPP) तत्त्वावर हाती घेण्याचा विचार आहे.

६.८ मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी असे सांगितले की, वरील मार्गांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केल्यानंतर प्रकल्प राबविण्याची प्रक्रिया व कालावधी यावर योग्य तो निर्णय त्यावेळी घेण्यात येईल.

६.९ प्राधिकरणाचे सदस्य श्री.नवाब मलिक, विधानसभा सदस्य यांनी असे मत व्यक्त केले की, धारावी, वांद्रे आणि कुर्ला येथे सुद्धा मोनोरेलसारख्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. या संदर्भात महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सदर परिसरात मोनोरेलची सुविधा पुरविण्याकरीता तपासणी करुन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

६.१० मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी असे निर्देश दिले की, बृहन्मुंबई महानगरपालिका व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी निकट समन्वय साधून योजना व प्रकल्प तयार करावेत. श्री.स्वाधीन क्षत्रिय, आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी असे सांगितले की, बृहन्मुंबई महानगरपालिका व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी संयुक्तपणे मुंबई महानगर प्रदेशाच्या विकासाकरीता संकल्पना योजना (concept plan) तयार करावी. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे सुधारीत विकास योजना तयार करताना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मेट्रो व मोनोरेल योजनांचा समावेश करण्यात यावा.

६.११ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील प्रस्ताव मंजूर केला :-

**ठराव क्र.१२४२ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उपकलम (१) चे पोटकलम (क), (ड), (ई) व (ग) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, मेसर्स ली असोसिएटस् साऊथ एशिया प्रा.लि., नवी दिल्ली यांनी तयार केलेल्या मुंबई महानगर प्रदेशासाठीचा मोनोरेल बृहत् आराखडा आणि निवडक मोनोरेल मार्गाचा प्राथमिक सुसाध्यता अभ्यासाच्या अहवालास याद्वारे प्राधिकरण मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.७ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा सन २००९-१० चा वार्षिक अहवाल.**

**७.१** महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या सन २००९-१० च्या वार्षिक अहवालाबाबत थोडक्यात माहिती दिली. त्यांनी असेही सांगितले की, प्राधिकरणामार्फत ज्या योजना व प्रकल्प राबविण्यात येतात, त्यांच्याबाबतची तपशीलवार माहिती वार्षिक अहवालामध्ये अंतर्भूत करण्यात आलेली आहे.

**७.२** त्यानंतर, प्राधिकरणाच्या सन २००९-१० च्या वार्षिक अहवालास प्राधिकरणाने मान्यता दिली व पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. १२४३ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सन २००९-१० च्या वार्षिक अहवालास प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे व हा अहवाल राज्य शासनास सादर करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.८ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे सन २००९-१० चे वार्षिक लेखे.**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या सन २००९-१० च्या वार्षिक लेख्याबाबत माहिती दिली. त्यानंतर, प्राधिकरणाने सन २००९-१० च्या वार्षिक लेख्यांना मान्यता दिली व पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१२४४ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (वित्तीय) विनियम, १९७६ च्या नियम १३(फ) अन्वये प्राधिकरण याद्वारे प्राधिकरणाच्या सन २००९-१० च्या

लेख्यांना मान्यता देत आहे. तसेच प्राधिकरणाचे सन २००९-१० या वर्षाचे आयकर विवरणपत्र विश्वस्त संस्था म्हणून आयकर कार्यालयाकडे सादर करण्यासही मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** ठरावाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.९ : अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर आणि परिसर अधिसुचित क्षेत्राच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये "बायोटेक पार्क" (Biotech Park) याबाबतचे नवीन विनियम अंतर्भूत करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ अन्वये शासनाच्या निर्देशानुसार फेरबदलाच्या कार्यवाहीबाबत.**

९.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र शासनाने अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्रासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त केलेले आहे. या अधिसूचित क्षेत्रासाठीची विकास योजना विकास नियंत्रण नियमावलीसह दिनांक २५ जुलै, २००५ च्या अधिसूचने अन्वये व काही भाग ई.पी. (Excluded parts) दिनांक ११ ऑगस्ट, २००८ च्या अधिसूचने अन्वये मंजूर केलेले आहेत. शासनाने दिनांक २७ फेब्रुवारी, २००९ च्या आदेश क्र.टीपीबी-४३०९/४१९/सीआर-२२/०९/युडी-११ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७(१) व १५४ अन्वये प्राधिकरणास या अधिसूचित क्षेत्रासाठीच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये "बायोटेक पार्क" (Biotech Park) याबाबतचे नवीन विनियम अंतर्भूत करण्यासाठी फेरबदलाची कार्यवाही सुरु करण्यासाठीचे निर्देश दिलेले आहेत. या निर्देशानुसार मंजूर विकास योजनेच्या I-1, I-2, I-3 झोनमध्ये १२ मीटर रुंदीच्या रस्त्यांवरील किमान २ एकर प्लॉटवर किंवा २०,००० चौ.फुट बांधकाम बायोटेक पार्क आणि युनिट यासाठी अनुज्ञेय होईल. तसेच बायोटेक युनिट/पार्क हे ना-विकास परिमंडळात (NDZ)/हरित परिमंडळात (G-Zone) यामध्ये ०.२ चटई क्षेत्र निर्देशांकाने अनुज्ञेय होईल व त्यासाठी १००% अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक देता येईल.

९.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, शासनाच्या दिनांक २७ फेब्रुवारी, २००९ च्या निर्देशानुसार प्राधिकरणाने संदर्भित फेरबदलाची नोटीस दिनांक १३ व १९ ऑगस्ट, २००९ च्या

..२५/-

शासन राजपत्रात तसेच दिनांक १५ ऑगस्ट, २००९ च्या मराठी दैनिक "सामना" व इंग्रजी दैनिक "हिंदुस्तान टाईम्स" यांमध्ये जनतेच्या सूचना व हरकती मागविण्यासाठी प्रसिध्द केली व त्या संबंधीची सुनावणी प्रक्रिया दिनांक ४ डिसेंबर, २००९ रोजी पूर्ण करण्यात आली. सुनावणी अधिकारी यांनी संदर्भित फेरबदल शासनाने दिलेल्या निर्देशानुसार व प्राधिकरणाने प्रसिध्द केलेल्या नोटीसनुसार विकास नियंत्रण नियमावलीमध्ये अंतर्भूत करण्यासाठी प्राधिकरणास प्रस्ताव सादर करण्याची शिफारस केल्याचे महानगर आयुक्त यांनी सांगितले.

९.३ त्यानंतर, बाब टिप्पणीतील परिच्छेद क्र.४ मधील प्रस्तावास प्राधिकरणाने मान्यता दिली व पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र.१२४५</u> :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** हे प्राधिकरण महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४०(१)(सी) अन्वये अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्रासाठी नियुक्त विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने शासनाच्या निर्देशानुसार अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्रासाठीच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये "बायोटेक पार्क" यासाठीचे नवीन विनियम अंतर्भूत करण्यासाठी महानगर आयुक्त यांनी बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्र.४(i)मध्ये नमुद केलेल्या महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७(१) अन्वये केलेल्या कार्यवाहीस याद्वारे मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** हे प्राधिकरण महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १५१(३) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, याद्वारे निर्देश देत आहे की, महानगर आयुक्त यांनी उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१) अनुसार अंतिम मंजुरीचे पुढील सोपस्कार करण्यासाठी सदर फेरबदलाची कार्यवाही पूर्ण करुन शासनास सदर प्रस्ताव मंजूरीसाठी सादर करावा. त्या अनुषंगाने अधिनियमानुसार आवश्यक असलेली सर्व कार्यवाही पूर्ण करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

..२६/-

**बाब क्र.१० : अंबरनाथ-कुळगांव-बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्राच्या मंजूर विकास योजनेमधील मौ.कुळगांव येथील स.नं.२०, हि.नं.९ व स.नं.२१, हि.नं.३ या जागेवर प्रस्तावित करण्यात आलेला पूर्व-पश्चिम ९.०० मी. रुंद रस्ता वगळणेबाबत शासनाने कळविल्यानुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ अन्वये फेरबदलाच्या कार्यवाहीबाबत.**

**१०.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र शासनाने अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्रासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त केलेले आहे. या अधिसूचित क्षेत्रासाठीची विकास योजना विकास नियंत्रण नियमावलीसह दिनांक २५ जुलै, २००५ च्या अधिसूचने अन्वये व काही भाग ई.पी. (Excluded parts) दिनांक ११ ऑगस्ट, २००८ च्या अधिसूचने अन्वये मंजूर केलेले आहेत. शासनाने दिनांक ११ मे, २०१० च्या पत्र क्र.टीपीएस-१२०८/३१५/प्र.क्र-१६२/०९/नवि-१२ नुसार या आधिसूचित क्षेत्राच्या मंजूर विकास योजनेतील मौजे कुळगांव येथील सर्व्हे नं २०, हि.नं.९ व सर्व्हे नं.२१, हि.नं.३ या जागेवर प्रस्तावित असलेला पूर्व-पश्चिम ९.०० मी. रुंद रस्ता हा या रस्त्याच्या आखणीमधील सर्व्हे नं.२१, हि.नं.३ वर अस्तित्वात असलेल्या तळ + ४ मजल्याच्या अधिकृत इमारतीमुळे स.नं २१/३ मधून जाणारा पूर्ण रुंदीचा रस्ता तयार करणे शक्य नाही. ही वस्तुस्थिती विचारात घेता स.नं.२०, हि.नं. ९ व स.नं.२१, हि.नं.३ या जागेवर प्रस्तावित करण्यात आलेला पूर्व-पश्चिम ९.०० मी. रुंद रस्ता वगळणेबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) नुसार विहित वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन फेरबदल प्रस्ताव शासनास सादर केल्यास त्याचा शासन स्तरावर गुणवत्तेनुसार विचार करुन निर्णय घेण्यात येईल, असे शासनाने दिनांक ११ मे, २०१० च्या पत्रानुसार प्राधिकरणास कळविल्याचे महानगर आयुक्तांनी सांगितले.

**१०.२** मंजूर विकास योजनेमधील सदर ९.०० मी. रुंदीच्या रस्त्याची आखणी व जागेवर आस्तिवात असलेल्या तळ + ४ मजल्याच्या इमारतीची माहिती महानगर आयुक्त यांनी दिली.

**१०.३** त्यानंतर, बाब टिप्पणीतील सदर ९.०० मी. रुंदीचा रस्ता वगळण्यासाठीच्या प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र.१२४६</u> :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** हे प्राधिकरण महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४०(१)(सी) अन्वये अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्रासाठी नियुक्त विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने शासनाने कळविल्यानुसार अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्रासाठीच्या मंजूर विकास योजनेमधील मौ. कुळगांव येथील स.नं. २०, हिं.नं. ९ व स.नं. २१, हि.नं. ३ या जागेवर प्रस्तावित करण्यात आलेला पूर्व-पश्चिम ९.०० मी. रुंद रस्ता वगळणेबाबत फेरबदलाची प्रक्रिया महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७(१) अन्वये सुरु करण्यास याद्वारे मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** हे प्राधिकरण महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७(१) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभुत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे वरीलप्रमाणे विकास योजनेमध्ये फेरबदल करण्यासंदर्भात जनतेकडून सूचना वा हरकती मागविणेसाठी, शासकीय राजपत्रात व दोन स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये नोटीस प्रसिध्द करणे तसेच ती नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून १ महिन्याच्या आत अशा फेरबदलाबाबत जनतेकडून सूचना वा हरकती स्विकारण्यास मान्यता देत आहे. तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १३९ अन्वये तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७-अ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे वरील नोटीस प्रसिध्द करण्यास महानगर आयुक्तांस प्राधिकृत करीत आहे.

"**आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** हे प्राधिकरण महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १५१(३) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, याद्वारे निर्देश देत आहे की,

महानगर आयुक्त किंवा महानगर आयुक्तांनी नामनिर्देशित केलेला अधिकारी, याबाबत आलेल्या सूचना वा हरकती यावर विचार करील आणि अशा सूचना व हरकती सादर करणा-या व्यक्तींचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१) अनुसार अंतिम मंजूरीचे पुढील सोपस्कार करण्यासाठी एक अहवाल प्रस्तावित फेरबदलासह महानगर आयुक्त यांना सादर करील. तसेच सदर फेरबदलाची वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन शासनास सदर प्रस्ताव मंजूरीसाठी सादर करण्यात येईल. त्या अनुषंगाने अधिनियमानुसार आवश्यक असलेली सर्व कार्यवाही पूर्ण करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.११ : अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर आणि परिसर अधिसुचित क्षेत्रामधील कुळगांव-बदलापूर नगरपरिषद क्षेत्रासाठीच्या मंजूर विकास योजनेमधील आरक्षण क्र.१०९ क्रीडांगण ऐवजी आर.टी.ओ. ट्रॉफिक पार्क, अस्तित्वातील एम.एस.ई.बी. स्विचिंग स्टेशन, बगीचा, आरक्षण क्र.११० ए.पी.एम.सी. ऐवजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक, नगरपरिषदेचे अद्ययावत रुग्णालय व आरक्षण क्र.१११ ए.पी.एम.सी. ऐवजी नगरपरिषदेची बी.एस.यु.पी. योजना असे करणेबाबत म.प्रा. व न.र. अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाच्या कार्यवाहीबाबत.**

**११.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र शासनाने अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्रासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त केलेले आहे. या अधिसूचित क्षेत्रासाठीची विकास योजना विकास नियंत्रण नियमावलीसह दिनांक २५ जुलै, २००५ रोजीच्या अधिसूचने अन्वये व काही भाग ई.पी. (Excluded parts) दिनांक ११ ऑगस्ट, २००८ रोजीच्या अधिसूचने अन्वये मंजूर केलेले आहेत. कुळगांव-बदलापूर नगरपरिषदेने दिनांक २५ फेब्रुवारी, २००९ च्या सर्वसाधारण सभेमधील ठराव क्र.११३ नुसार मौजे सोनिवली, ता.अंबरनाथ येथील मंजूर विकास योजनेमधील विकास आराखडयातील आरक्षण क्र.१०९ क्रिडांगण व आरक्षण क्र.११० ए.पी.एम.सी. मार्केट या ऐवजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक, नगरपरिषदेची बी.एस.यू.पी. योजना, परिवहन विभागाच्या मागणीनुसार ट्राफिक पार्क, उर्वरीत क्षेत्र मनोरंजनासाठी खुली जागा यासाठी आरक्षणामध्ये बदल करण्यासाठी नगरपरिषदेने मंजूरी दिल्याचे महानगर आयुक्तांनी सांगितले.

..२९/-

या प्रकरणी शासनाच्या नगर विकास विभागाने दिनांक ८ फेब्रुवारी, २०१० च्या पत्रान्वये सदर क्षेत्रासाठी नियोजन प्राधिकरण मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण असल्याने आवश्यक तो फेरबदल प्रस्ताव कलम ३७ मधील सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन शासनास सादर केल्यास त्यावर गुणवत्तेनुसार निर्णय घेता येऊ शकेल असे नगरपरिषदेस कळविले होते. त्युनसार नगरपरिषदेने दिनांक १२ मार्च, २०१० च्या पत्रान्वये प्राधिकरणास सदर फेरबदल प्रस्ताव शासनाच्या मंजूरीसाठी पाठविण्याची विनंती केलेली आहे. नगरपरिषदेने यासाठीचा सुधारीत नकाशा प्राधिकरणाकडे पाठविला होता. नगरपरिषदेच्या सुधारीत नकाशानुसार सदर फेरबदलाखाली आरक्षण क्र.१०९, ११० व १११ येत असल्याने त्यानुसार या तीनही आरक्षणांचा फेरबदल प्रस्ताव प्राधिकरणाच्या विचारार्थ व मान्यतेसाठी सादर केला असल्याचे महानगर आयुक्तांनी सांगितले.

**११.२** महानगर आयुक्तांनी असेही सांगितले की, आरक्षण क्र.१०९ क्रिडांगण (३.९६ हेक्टर) या ऐवजी आर.टी.ओ. ट्रॉफिक पार्क (०.८ हेक्टर), अस्तित्वातील एम.एस.इ.बी. स्विचिंग स्टेशन (०.४ हेक्टर), बगीचा (२.७६ हेक्टर) हे जमीन वापर नगरपरिषदेच्या विनंतीनुसार प्रस्तावित केले आहेत. तसेच आरक्षण क्र.११० ए.पी.एम.सी. (२.८२ हेक्टर) या वापराऐवजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक (१.३ हेक्टर) व नगरपरिषदेचे अद्ययावत रुग्णालय (१.५२ हेक्टर) हे जमीन वापर नगरपरिषदेच्या विनंतीनुसार प्रस्तावित केले आहेत. आरक्षण क्र.१११ ए.पी.एम.सी. (०.७२ हेक्टर) या वापराऐवजी नगरपरिषदेची बी.एस.यु.पी. योजना असा फेरबदल नगरपरिषदेच्या विनंतीनुसार प्रस्तावित असल्याचे महानगर आयुक्तांनी सांगितले. या तीनही आरक्षणांच्या फेरबदलाखाली एकूण ७.५ हेक्टर क्षेत्रफळाची जमीन असल्याचे महानगर आयुक्तांनी प्राधिकरणाच्या निदर्शनास आणले.

**११.३** सदर प्रस्तावावर चर्चा करताना, मा.सदस्यांनी असे मत व्यक्त केले की, अस्तित्वातील एम.एस.इ.बी. स्विचिंग स्टेशन, आर.टी.ओ. ट्रॉफिक पार्क, बगीचा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक, रुग्णालय, बी.एस.यु.पी. योजना या बाबी सार्वजनिक प्रयोजनार्थ असल्याने नगरपरिषदेच्या विनंतीनुसार बाब टिप्पणीतील आरक्षणांमध्ये प्रस्तावित फेरबदल करण्याची प्रक्रिया सुरु करण्यास हरकत नाही.

..३०/-

११.४ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.१२४७ :

**"असा ठराव करण्यात येत आहे की** हे प्राधिकरण, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४०(१)(सी) अन्वये अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्रामधील कुळगांव-बदलापूर नगरपरिषद क्षेत्रासाठीच्या मंजूर विकास योजनेमधील आरक्षण क्र.१०९ क्रिडांगण ऐवजी आर.टी.ओ. ट्रॅफिक पार्क, अस्तित्वातील एम.एस.ई.बी. स्विचिंग स्टेशन, बगीचा, आरक्षण क्र.११० ए.पी.एम.सी. ऐवजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, नगरपरिषदेचे अद्ययावत रुग्णालय व आरक्षण क्र.१११ ऐवजी नगरपरिषदेची बी.एस.यु.पी योजना असे फेरबदल करणेबाबतची प्रक्रिया महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७(१) अन्वये सुरु करण्यास याद्वारे मंजूरी देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की** हे प्राधिकरण, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७(१) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभुत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे वरीलप्रमाणे विकास योजनेमध्ये फेरबदल करण्यासंदर्भात जनतेकडून सुचना वा हरकती मागविणेसाठी, शासकीय राजपत्रात व दोन स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये नोटीस प्रसिध्द करणे तसेच ती नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून १ महिन्याच्या आत अशा फेरबदलाबाबत जनतेकडून सूचना वा हरकती स्वीकारण्यास मान्यता देत आहे. तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १३९ अन्वये तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७-अ अन्वये मिळालेल्या अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे वरील नोटीस प्रसिध्द करण्यास महानगर आयुक्तांस प्राधिकृत करीत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की** हे प्राधिकरण, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १५१(३) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि

याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, याव्दारे निर्देश देत आहे की, महानगर आयुक्त किंवा महानगर आयुक्तांनी नामनिर्देशित केलेला अधिकारी, याबाबत आलेल्या सूचना व हरकती यावर विचार करील आणि अशा सूचना व हरकती सादर करणा-या व्यक्तींचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१) अनुसार अंतिम मंजूरीचे पुढील सोपस्कार करण्यासाठी एक अहवाल प्रस्तावित फेरबदलासह महानगर आयुक्त यांना सादर करील. तसेच सदर फेरबदलाची वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन शासनास सदर प्रस्ताव मंजूरीसाठी सादर करण्यात येईल. त्या अनुषंगाने अधिनियमानुसार आवश्यक असलेली सर्व कार्यवाही पूर्ण करणेसाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१२ : अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्राच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम क्र.११.४ मधील "ना-विकास परिमंडळातील" इतर शैक्षणिक इमारती व अन्य सामाजिक वापरांसाठीचा ०.१ चटई क्षेत्र निर्देशांक हा ०.२ एवढा वाढविण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ अन्वये शासनाच्या निर्देशानुसार फेरबदलाच्या कार्यवाहीबाबत.**

**१२.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र शासनाने अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्रासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त केलेले आहे. या अधिसूचित क्षेत्रासाठीची विकास योजना विकास नियंत्रण नियमावलीसह दिनांक २५ जुलै, २००५ रोजीच्या अधिसूचने अन्वये व काही भाग ई.पी. (Excluded parts) दिनांक ११ ऑगस्ट २००८ रोजीच्या अधिसूचने अन्वये मंजूर केलेले आहेत. अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्राच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील नियम क्र.११.४, तक्ता क्र.५, अ.क्र.८(बी) नुसार ना-विकास परिमंडळात इतर शैक्षणिक संस्था, समाज मंदिर, क्लब, कल्याणकेंद्र, जिमखाना, सार्वजनिक वाचनालये, कलादालने वस्तुसंग्रहालये, श्रोतगृहे, चित्रपटगृहे, सार्वजनिक हॉल, सिनेमागृहे आणि करमणुकीची इतर ठिकाणे हे वापर ०.१ चटई क्षेत्र निर्देशांकाने अनुज्ञेय आहेत. सदर सामाजिक प्रयोजनासाठी चटई क्षेत्र निर्देशांक वाढविणे गरजेचे असल्याने शासनाने आदेश

क्र.टीपीएस-१२०९/८८१/प्र.क्र-२४९/०९/नवि-१२,दिनांक २९ जून, २००९ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) अन्वये अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्रासाठीच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील नियम क्र.११.४, तक्ता क्र.५, अ.क्र.८(बी) मधील रकाना क्र.०८ मधील "Permitted" या शब्दास "Permitted with 0.2 F.S.I" असे बदलणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाच्या कार्यवाहीबाबत निर्देश दिलेले असल्याचे महानगर आयुक्तांनी सांगितले. शासनाच्या निर्देशानुसार महानगर आयुक्तांनी फेरबदल प्रक्रियेतील जनतेकडून सूचना व हरकती मागविणे, त्यावर सुनावणी देणे, सुनावणीचा अहवाल तयार करणे इत्यादी वैधानिक कार्यवाहीचे टप्पे पूर्ण झाल्याचे सांगितले. श्री.टी.सी.बेंजामिन, प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी असे सांगितले की, ना-विकास परिमंडळातील इतर शैक्षणिक इमारती व अन्य सामाजिक वापरासाठींचा ०.१ चटईक्षेत्र निर्देशांक हा ०.२ करण्यासाठीचा सदरचा शासनाच्या निर्देशानुसारचा फेरबदल प्रस्ताव मुंबई महानगर प्रदेशाच्या प्रादेशिक योजनेमधील विनियमांशी सुसंगत असल्याने अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्राच्या विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम क्र. ११.४ मध्ये तसा फेरबदल करणे उचित होईल.

**१२.२** त्यानंतर, बाब टिप्पणीतील परिच्छेद क्र.४ मधील प्रस्तावास प्राधिकरणाने मान्यता दिली व पुढील ठराव मंजूर केला.

**<u>ठराव क्र.१२४८</u> :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** हे प्राधिकरण महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४०(१)(सी) अन्वये अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्रासाठी नियुक्त विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने शासनाच्या निर्देशानुसार अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्रासाठीच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. ११.४ मधील 'ना-विकास परिमंडळातील' इतर शैक्षणिक इमारती व अन्य सामाजिक वापरांसाठीचा ०.१ चटईक्षेत्र निर्देशांक हा ०.२ एवढा वाढविण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ अन्वये शासनाच्या निर्देशानुसार सुधारित विनियम

अंतर्भूत करण्यासाठी महानगर आयुक्त यांनी बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्र.४(i) मध्ये नमूद केलेल्या महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७(१) अन्वये केलेल्या कार्यवाहीस याद्वारे मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** हे प्राधिकरण महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १५१(३) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, याद्वारे निर्देश देत आहे की, महानगर आयुक्त यांनी उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१) अनुसार अंतिम मंजुरीची पुढील कार्यवाही करण्यासाठी सदर फेरबदलाची वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन शासनास सदर प्रस्ताव मंजूरीसाठी सादर करावा. त्या अनुषंगाने अधिनियमानुसार आवश्यक असलेली सर्व कार्यवाही पूर्ण करण्यास महानगर आयुक्त यांना बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्र. ४(ii) मध्ये नमूद केल्याप्रमाणे याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.१३ : मुंबई महानगर क्षेत्रात ई-कच-याची विल्हेवाटीबाबत धोरण ठरविणे व सुविधा उभारण्याबाबत कार्यवाही करणे.</u>**

**१३.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास घनकच-याची विल्हेवाट लावण्यासाठी तळोजा-अंबरनाथ येथे शासनाची ७५० एकर जमीन नुकतीच मिळालेली आहे. याबाबत महानगर आयुक्त यांनी शासनाचे आभार व्यक्त केले. प्राधिकरणाने तयार केलेल्या प्राथमिक अहवालानुसार मुंबईमध्ये सुमारे ८,००० मेट्रीक टन आणि मुंबई महानगर प्रदेशात ११,००० मेट्रीक टन एवढा घनकचरा निर्माण होतो. तसेच भविष्यात घनकचरा सतत वाढत जाणार आहे. या घनकचरा व्यवस्थापन उपाययोजनेसाठी सामायिक भराव भूमीची कल्पना मांडलेली होती व आता "निरी" सारख्या नामवंत संस्थेद्वारे या सामायिक भरावभूमी योजनेचा अभ्यासही अंतिम टप्प्यात आहे.

..३४/-

१३.२ महानगर आयुक्त यांनी मुंबई महानगर क्षेत्रातील ई-कच-याच्या समस्येबददल सविस्तर माहिती दिली व असेही नमूद केले की, भविष्यात ही समस्या गंभीर स्वरुपाची होणार आहे. हयासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे एक प्रकल्प स्थापित करण्यासाठी कालबध्द योजनाही तयार करण्यात आली आहे.

१३.३ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने विविध स्तरावर ई-कच-याची विल्हेवाट सुविधा उभारण्याकरीता प्राथमिक अभ्यास केलेला आहे. ई-कच-याची विल्हेवाट न झाल्यामुळे प्रदुषणाची गंभीर समस्या निर्माण होत आहे व त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. त्यामुळे ई-कच-याच्या निष्कासित करण्याच्या गंभीर समस्येवर तोडगा काढणे अत्यंत आवश्यक आहे.

१३.४ या सर्व बाबींचा विचार करुन ही योजना कार्यान्वित करण्यासाठी सल्लागाराची (Transaction Advisor) नेमणूक करण्यासाठी प्राधिकरणाद्वारे निविदा मागविण्यात आलेल्या आहेत.

१३.५ प्राधिकरणाचे सदस्य श्री.आशिष शेलार, नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी असे सांगितले की, ई-कचरा व घनकचरा यांची विल्हेवाट लावण्यासाठी मुंबई महानगर प्रदेशात प्रकल्प उभारण्याची आवश्यकता आहे.

१३.६ या प्रस्तावाला प्राधिकरणाची संवैधानिक मान्यता मिळावी अशी विनंती केली आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने हाती घेतलेल्या हया योजनेची मा.मुख्यमंत्री व सर्व सदस्यांनी प्रशंसा केली व प्रस्तावास मान्यता दिली.

१३.७ मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी असे मत व्यक्त केले की, राज्यात सर्वत्र घनकचरा व्यवस्थापनामध्ये मोठया प्रमाणात त्रुटी असून एकसूत्रतेचाही प्रकर्षाने अभाव दिसून येतो. त्यावर श्री.जे.पी.डांगे, मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनीही हया अनुषंगाने शासकीय धोरण व कार्यक्रम ठरविणे अत्यंत गरजेचे आहे असे मत मांडले. त्यावर घनकचरा व्यवस्थापनाचा प्रश्न

..३५/-

कायमस्वरुपी मार्गी लावण्यासंबंधी नगर विकास विभागातर्फे लवकरच उच्चस्तरीय समिती गठीत करुन, त्याच्या माध्यमातून सर्व बाबींचा विचार करुन महिनाभरात अहवाल तयार करण्यात येईल असे आश्वासन श्री.मनुकुमार श्रीवास्तव, सचिव, नगर विकास विभाग यांनी दिले.

**१३.८** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या क्षेत्रात ई-कच-याची विल्हेवाट लावण्याचे धोरण ठरविण्याबाबत व सुविधा उभारण्याबाबत कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली.

**१३.९** त्यानंतर, बाब टिपण्णीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र.१२४९</u> :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम २१(अ) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरणाद्वारे मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात "ई-कचरा विल्हेवाट सुविधा" निर्माण करणे, तसेच अनुषंगिक बाबींची पूर्तता करुन एकसूत्रता आणण्यासाठी मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील सर्व बाबींच्या अंमलबजावणीसाठी महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.१४</u> : <u>वांद्रे-कुर्ला संकुलाच्या नियोजन प्रस्तावामधील प्रस्तावित वांद्रे-कुर्ला रेल्वे जोडमार्गाचे मार्ग रेखन बगळण्याबाबत.</u>**

**१४.१** या प्रस्तावाबाबत महानगर आयुक्तांनी थोडक्यात माहिती देताना असे सांगितले की, शासनाने दिनांक ११ जानेवारी, २००० च्या अधिसूचना क्र.बीकेआर-१०९७/१२९७/सीआर-१६९/९७/युडी-११ अन्वये वांद्रे-कुर्ला संकुलाच्या मंजूर नियोजन प्रस्तावामध्ये काही नवीन प्रस्तावांचा समावेश करण्यास मंजूरी दिली आहे, या प्रस्तावांपैकी काही प्रस्ताव खालीलप्रमाणे आहेत :-

(३) वांद्रे रेल्वे स्टेशन आणि "ई" ब्लॉकमधील प्रस्तावित रेल्वे स्टेशन दरम्यानच्या दोन पर्यायासह वांद्रे ते कुर्ला रेल्वे सुधारीत मार्गरेखन (allignment) तसेच ड्राईव्ह-इन-थिएटरच्या दक्षिण-पूर्व भागात कर्षण उपकेंद्रासाठी ५,००० चौ.मी. क्षेत्रफळाचे आरक्षण समाविष्ट केले आहे.

..३६/-

(४) वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "ई" आणि "जी" ब्लॉकमधील प्रस्तावित रेल्वे स्टेशनांच्या वर वाणिज्यिक संकुलाचा प्राधिकरणातर्फे विकास करण्यासाठी समाविष्ट केले आहे.

**१४.२** महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, शासनाने दिनांक १४ नोव्हेंबर, २००६ च्या अधिसूचना अन्वये चारकोप-वांद्रे-मानखुर्द छन्नमार्ग-२ साठीच्या मेट्रो रेलच्या मार्गसंरेखनास मंजूरी दिली आहे. सदर मेट्रो रेल ही वांद्रे स्टेशन ते वांद्रे-कुर्ला संकुल ते कुर्ला स्टेशन अशा भागांना जोडणारी मेट्रो रेल आहे. सदर प्रकल्प हा सन २०१३ पर्यंत पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे. वांद्रे-कुर्ला संकुलातील मेट्रो रेलमुळे या मार्गावरील प्रस्तावित स्थानकापासूनच्या प्रवासी वाहतूकीच्या सुधारीत व्यवस्थेसाठी, तसेच वाहतूकीची साधने बदलण्यास आवश्यक असलेल्या सोयी पुरविण्यासाठी तसेच या परिसरात राहणा-या लोकांच्या व वांद्रे-कुर्ला संकुलामध्ये कामासाठी येणा-या लोकांच्या प्रवासासाठी उपयुक्त अशी सोय उपलब्ध होईल. तसेच सदर मेट्रो रेल्वे मार्गाच्या बांधकामास सुरुवातही झाली आहे. रेल्वे विभागाने मागील अंदाजे दहा वर्षात वांद्रे-कुर्ला संकुलाच्या मंजूर नियोजन प्रस्तावांमध्ये दर्शविलेले प्रस्तावित वांद्रे-कुर्ला रेल्वे मार्गाच्या वांद्रे-कुर्ला स्टेशनजवळील मार्गरेखनास अंतिम मंजूरी दिलेली नसून हा प्रकल्प आता एम्युटीपी-II मधून सुध्दा वगळण्यात आला आहे आणि या कामास आजपावेतो अजून सुरुवात देखील केलेली नाही, त्यामुळे नियोजित वांद्रे-कुर्ला रेल्वे जोडणारा मार्ग मंजूर नियोजन प्रस्तावामध्ये दाखविण्याची आवश्यकता नसल्यामुळे सदर वांद्रे-कुर्ला रेल्वे जोडणारा मार्ग मंजूर नियोजन प्रस्तावामधून वगळण्याचा प्रस्ताव आहे. या नियोजित वांद्रे-कुर्ला रेल्वेला लागणा-या इलेक्ट्रीक सप्लायसाठी ५००० चौ.मीटरचे कर्षण उपकेंद्र हे ड्राईव्ह-इन थिएटरच्या दक्षिण-पूर्व भागात आरक्षित केले आहे. वांद्रे-कुर्ला रेल्वे जोडमार्ग वगळण्याचा प्रस्ताव असल्यामुळे या रेल्वेला लागणा-या इलेक्ट्रीक सप्लायसाठी ५००० चौ.मी. च्या कर्षण उपकेंद्राची आवश्यकता नाही पण आता मेट्रो रेल्वेला लागणा-या इलेक्ट्रीक सप्लायसाठी ७९० चौ.मी. क्षेत्रफळाची जागा कर्षण उपकेंद्रासाठी लागणार आहे. त्यामुळे ड्राईव्ह-इन आरक्षित थिएटरमधील ५००० चौ.मी. क्षेत्रफळापैकी आता ७९० चौ.मी. इतके क्षेत्र कर्षण उपकेंद्रासाठी लागणार असल्यामुळे उर्वरीत क्षेत्रफळापैकी ४२१० चौ.मी. एवढे क्षेत्र हे वाणिज्य वापरासाठी तसेच "ई" आणि "जी" ब्लॉकमध्ये प्रस्तावित केलेल्या रेल्वे स्टेशनच्या ऐवजी वाणिज्यिक वापरासाठी आरक्षित करण्याचे प्रस्तावित केले आहे. यामुळे ही जागा भूखंड विकसित होण्यासाठी उपलब्ध होऊ शकतील व उपलब्ध

..३७/-

होणा-या भूखंडावर वाणिज्यिक वापरासाठी अंदाजे ४.०० व अधिक चटई क्षेत्र निर्देशांक वापरता येईल. ही बाब लक्षात घेता, मंजूर नियोजन प्रस्तावामध्ये सदर किरकोळ बदल करण्याचा प्रस्ताव आहे. सदर बदल हा महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ अन्वये करण्याचे प्रस्तावित केले आहे असे सांगितले.

**१४.३** नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासनाची सदर फेरबदलाच्या प्रस्तावास अंतिम मंजूरी मिळतेवेळी उपरोक्त क्षेत्र हे समुद्र तट विकास नियंत्रण कायद्याने बाधित असल्यामुळे फेरबदलाच्या प्रस्तावास समुद्र तट विकास दृष्टीने देखील परवानगी मिळावी असे अपेक्षित आहे.

**१४.४** प्राधिकरणाचे सदस्य श्री.नवाब मलिक, विधानसभा सदस्य यांनी असे सुचविले की, प्रस्तावित वांद्रे-कुर्ला रेल्वे जोडमार्ग वगळण्याबाबतच्या प्रस्तावाबाबत रेल्वे विभागाकडून माहिती मागविली होती का? त्यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सदर फेरबदलाच्या प्रस्तावाबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम-३७ अन्वये वर्तमानपत्रात नोटीस प्रसिध्द करुन जनतेकडून आक्षेप व सूचना मागविण्यात येतील, तेव्हा या नोटीसची प्रत रेल्वे विभागाला पाठविण्यात येईल. त्यांची सूचना/आक्षेप प्राप्त होताच, रेल्वे विभागाशी चर्चा करण्यात येईल.

**१४.५** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मान्य केला :-

**ठराव क्र.१२५० :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४०(१)(सी) अनुसार वांद्रे-कुर्ला अधिसूचित क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती झाल्यानंतर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४०(३) तसेच कलम ३७(१) अनुसार मिळालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत ठरणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे प्रस्तावित वांद्रे-कुर्ला रेल्वे मार्गाचे मार्ग रेखन वगळण्यासाठी व भूखंडाच्या जमीन वापरा संदर्भातील मंजूर नियोजन प्रस्तावांत बाब टिप्पणीमध्ये नमूद केल्याप्रमाणे फेरबदल करण्यास मंजूरी देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७(१) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे शासकीय राजपत्रात आणि दोन स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये नोटीस प्रसिध्द करण्यास आणि अशी नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून एक महिन्याच्या आत अशा फेरबदलाबाबत जनतेकडून आक्षेप व सूचना मागविण्यासाठी मान्यता देत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १३९ अन्वये तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७(अ) अन्वये मिळालेल्या अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे वर नमूद केलेली नोटीस प्रसिध्द करण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

**"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १५१(३) अन्वये मिळालेल्या अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे असे निर्देश देत आहे की, महानगर आयुक्त किंवा महानगर आयुक्तांनी नामनिर्देशित केलेला व वरिष्ठ नियोजकांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी, याबाबत असलेल्या सूचना किंवा आक्षेप यावर विचार करील आणि असे आक्षेप व सूचना दाखल करणा-या व्यक्तींचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१) अनुसार अंतिम मंजूरीचे पुढील सोपस्कार करण्यासाठी एक अहवाल प्रस्तावित फेरबदलासह महानगर आयुक्तांना सादर करील. तसेच सदर फेरबदलाची वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन शासनास सदर प्रस्ताव मंजूरीसाठी सादर करण्यात येईल. या अनुषंगाने अधिनियमानुसार आवश्यक असलेली सर्व कार्यवाही पूर्ण करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१५ : मेट्रो छन्नमार्ग टप्पा-२ आणि ३ चे सविस्तर प्रकल्प अहवालांबाबत सद्यस्थिती.**

**१५.१** महानगर आयुक्त यांनी सदर विषयावर माहिती देताना असे सांगितले की, मुंबई मेट्रो रेल व्यवस्थेकरीता बृहत योजना तयार करण्यासाठी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने

दिल्ली मेट्रो रेल महामंडळाची (डी.एम.आर.सी.) मे, २००३ मध्ये नेमणूक केली होती. मुंबई मेट्रो बृहत योजनेसंबंधी लोकांची मते, सूचना व अभिप्राय प्राप्त करण्याच्या दृष्टीकोनातून सार्वजनिक विचारविनिमय कार्यशाळा दिनांक २२ जानेवारी, २००४ रोजी आयोजित केली होती. दिनांक २८ मे, २००४ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या ११०व्या बैठकीत, मुंबई मेट्रोच्या बृहत आराखडयास मान्यता देण्यात आली. बृहत आराखडयात नऊ छन्नमार्ग असून त्यांची एकूण लांबी १४६.५ कि.मी. आहे. त्यापैकी ३२.५ कि.मी. हा भुयारी मार्ग प्रस्तावित आहे. या बृहत् आराखडयातील छन्नमार्गांची अंमलबजावणी ३ टप्प्यांमध्ये प्रस्तावित आहे. टप्पा-१ मध्ये ३ छन्नमार्ग असून वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर (११.०५ कि.मी.) या पहिल्या छन्नमार्गाची अंमलबजावणी प्रगतीपथावर आहे. सवलत करारनाम्यानुसार पहिला छन्नमार्ग २०१२ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. टप्पा-१ मधील चारकोप-वांद्रे-मानखुर्द (३२ कि.मी.) या दुस-या छन्नमार्गाचा सवलत करारनामा २१ जानेवारी, २०१० रोजी महाराष्ट्र शासन व मेसर्स रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर, SNC Lavalin Inc. (कॅनडा), रिलायन्स कम्युनिकेशन लिमिटेड यांच्यामध्ये स्वाक्षरीत झाला आणि वित्तीय ताळेबंद ऑक्टोबर, २०१० पर्यंत अपेक्षित असून प्रकल्पाची अंमलबजावणी नोव्हेंबर, २०१० मध्ये सुरु होणे अपेक्षित आहे. कुलाबा-माहिम-वांद्रे (२० कि.मी.) या टप्पा-१ मधील तिस-या छन्नमार्गाचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाने भारत सरकारच्या पायाभूत प्रकल्प योजना आणि व्यवहार्य तफावत निधी मार्गदर्शक तत्वांतर्गत (VGF Guidelines), सार्वजनिक खाजगी सहभाग (PPP) या स्वरुपात अंमलबजावणी करण्यासंदर्भात तत्वतः मान्यता मिळविण्यासाठी आर्थिक व्यवहार विभाग (DEA), भारत सरकार यांच्याकडे दिनांक ४ जून, २०१० रोजी अग्रेषित केला आहे.

**१५.२** मेट्रो छन्न मार्ग टप्पा २ आणि ३ मध्ये एकूण ६ छन्नमार्ग असून सिद्धीविनायक ते शिवडी (३.५ कि.मी.) या नवव्या छन्नमार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल M/s RITES Ltd. या सल्लागाराने मुंबई पार बंदर मेट्रो रेल जोडणी अभ्यासाअंतर्गत एप्रिल, २०१० मध्ये पूर्ण केलेला आहे. या छन्नमार्गाची लांबी अत्यंत लहान असून याची अंमलबजावणी मुंबई पार बंदर मेट्रो रेल जोडणी (MTHL Metro) सोबत करण्यात येईल. टप्पा २ व ३ मधील उर्वरित छन्नमार्ग ४ ते ८ यांचे

सविस्तर प्रकल्प अहवाल बनविण्याकरीता दिनांक १८.११.२००९ रोजी खालील सल्लागारांची नियुक्ती करण्यात आली.

| छन्नमार्ग क्रमांक | छन्नमार्गांची नावे | सल्लागार |
|---|---|---|
| ४ | चारकोप - दहिसर | M/s. SPAN Consultants Pvt.ltd. |
| ५ | अंधेरी (पू.) ते दहिसर (पू.) | M/s. SPAN Consultants Pvt.ltd. |
| ६ | वांद्रे-कुर्ला संकुल ते विमान तळाद्वारे कांजुरमार्ग | M/s RITES Ltd. & LASA Pvt.Ltd (JV) |
| ७ | घाटकोपर-मुलुंड | M/s CES (I) Pvt.Ltd. |
| ८ | हुतात्मा चौक ते घाटकोपर | M/s CES (I) Pvt.Ltd. |

**१५.३** सदर विषयावर चर्चा करताना प्राधिकरणाचे सदस्य श्री.आशिष शेलार, नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी अशी विचारणा केली की, मेट्रो लाईन-२ चारकोप-वांद्रे-मानखुर्द छन्नमार्गावरील लिंकिंग रोड येथे भूमिगत मेट्रो करण्याची लोकांची मागणी असल्याने त्याबाबत प्राधिकरणाची भूमिका काय आहे? तसेच निवृत्त प्राध्यापक धिंग्रा, आयआयटी, मुंबई यांनी तयार केलेल्या अहवालानुसार भूमिगत मेट्रो मार्ग हा उन्नत मार्गापेक्षा स्वस्त आहे.

**१५.४** सदर प्रस्तावावर माहिती देताना प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी असे सांगितले की, भूमिगत मेट्रो करावयाची असेल तर त्यासाठी उन्नत मार्गावरुन सुमारे १२ मी. उंचीवरुन मेट्रो रेल्वेला भूमिगत २० मी. खोलीपर्यंत जाण्याकरीता सुमारे ६०० ते ९०० मी. मोकळी जागा लागणार आहे. तशी जागा अत्यंत गर्दी असलेल्या लिंकिंग रोडवर उपलब्ध नाही. तसेच उन्नत मार्गाचा खर्च सुमारे रु.२५० कोटी अंदाजित आहे, तर भूमिगत मार्गाचा खर्च सुमारे रु.६०० कोटी प्रति कि.मी., दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या अहवालाप्रमाणे अंदाजित आहे. मेसर्स लुईस बर्जर यांनी या विषयावर केलेल्या अभ्यासावरुन असे निदर्शनास येते की, मेट्रो मार्ग लिकिंग रोडवर भूमिगत करणे तांत्रिकदृष्टया शक्य होणार नाही.

**१५.४** त्यानंतर, मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी या प्रस्तावावर असे सांगितले की, या विषयावर लोकांची मते घेऊन अनेक वेळा लोकप्रतिनिधींसोबत चर्चा करण्यात आली. तसेच

प्राधिकरणाच्या इतर सदस्यांचे सुद्धा असेच म्हणणे आहे की, फक्त लिंकिंग रोडपुरतेच मर्यादित मेट्रो भूमिगत करता येणार नाही. जर हा मेट्रो मार्ग भूमिगत करावयाचा असेल तर तो पूर्णपणे करावा लागेल.

१५.५ तसेच प्राधिकरणाचे सदस्य श्री.आशिष शेलार, नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी मेट्रो ॲक्टबद्दल सांगताना भारत सरकार यांनी मेट्रो ॲक्ट अमेंडमेंटवरील (ज्याच्यामध्ये सार्वजनिक खाजगी सहभाग तत्त्वावर सध्या राबविण्यात येत असलेल्या मेट्रो लाईन-१ (वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर) व लाईन-२ (चारकोप-वांद्रे-मानखुर्द) यांच्यावर मोठया अडचणी येऊ शकतात.) पूर्ण अधिकार रेल्वेकडे सोपविण्यात येणार असून याविषयी तीव्र विरोध दर्शविल्याबद्दल मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांचे अभिनंदन केले. तसेच सदर विषयावर राज्य शासनाने घेतलेल्या भूमिकेवर पूर्ण पाठिंबा आहे, असे सांगण्यात आले.

१५.६ त्यानंतर, प्राधिकरणाने प्रकल्पाच्या सद्यस्थिती अहवालाची नोंद घेतली.

**बाब क्र.१६ : ठाणे जिल्हयाच्या कल्याण व अंबरनाथ तालुक्यातील २७ गावांच्या अधिसूचित क्षेत्रासाठीची प्रारुप विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम २६ अन्वये जनतेकडून सूचना व हरकती मागविण्यासाठी प्रसिध्द करण्याबाबत.**

१६.१ सदर प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, ठाणे जिल्हयाच्या कल्याण व अंबरनाथ तालुक्यातील २७ गावांच्या क्षेत्रासाठी शासनाने दिनांक ९ ऑगस्ट, २००६ च्या अधिसूचने अन्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली आहे. प्राधिकरणाने दिनांक २४ डिसेंबर, २००७ च्या ठराव क्र.११३६ अन्वये या अधिसूचित क्षेत्राची विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर केला आणि याबाबतची अधिसूचना /नोटीस दिनांक ७ फेब्रुवारी, २००८ च्या महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द केली. प्राधिकरणाने दिनांक ११ फेब्रुवारी, २०१० च्या पत्रान्वये प्रारुप विकास योजना प्रसिध्द करण्याच्या दोन वर्षांच्या विहित कालावधीमध्ये ६ फेब्रुवारी, २०११ पर्यंत एक वर्षाची मुदतवाढ मिळण्याचा प्रस्ताव सादर केला आहे. प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ३० मे, २००८ च्या ठराव क्र.१०९३ नुसार या

अधिसूचित क्षेत्राची विकास योजना तयार करण्यासाठी सेंटर फॉर एनव्हॉयर्मेंटल प्लॅनिंग अँड टेक्नॉलॉजी अहमदाबाद (CEPT) यांची सल्लागार म्हणून दिनांक २२ जुलै, २००८ रोजी नियुक्ती करण्यात आली. सल्लागारांनी तयार केलेले प्रारुप विकास योजनेचे प्रस्ताव व विकास नियंत्रण नियमावली जनतेकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी प्रसिध्द करण्याच्या पुढील कार्यवाहीस प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी सादर केले असल्याचे महानगर आयुक्तांनी सांगितले.

**१६.२** सदर प्रस्तावावर चर्चा करताना प्राधिकरणाचे सदस्य श्री.नबाब मलिक, विधानसभा सदस्य यांनी असे सांगितले की, विकास योजनेचे प्रस्ताव व विकास नियंत्रण नियमावली या दोन्हींच्या अहवालांचा अभ्यास करण्यासाठी पुरेसा अवधी मिळणे आवश्यक आहे. प्राधिकरणाचे निमंत्रित श्री.रमेश जाधव, महापौर, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी असे निदर्शनास आणले की, सदर २७ गावांच्या कालबध्द विकासासाठी प्रारुप योजना प्रसिध्द होणे गरजेचे आहे. श्री.टी.सी.बेंजामिन, प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी असे सांगितले की, प्रारुप विकास योजना लवकरात लवकर प्रसिध्द करणे गरजेचे आहे व त्यावरील प्राप्त सूचना/हरकती विचारात घेऊन त्यानुसार अंतिम अहवाल मंजूरीसाठी प्राधिकरणाला शासनाकडे सादर करावा लागेल.

**१६.३** त्यानंतर, मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांच्या परवानगीने सल्लागारांनी प्रारुप विकास योजनेचे थोडक्यात सादरीकरण केले. या सादरीकरणानंतर मा.अध्यक्षांनी सदर प्रारुप विकास योजना ही सदस्यांना अभ्यासासाठी पुरेसा कालावधी मिळण्याच्या दृष्टीने प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत सादर करण्याचे निर्देश दिले.

**बाब क्र.१७ : ठाणे जिल्हयाच्या भिवंडी तालुक्यातील ५१ गावांच्या (सुधारीत ६० गावे) भिवंडी परिसर अधिसूचित क्षेत्रासाठी प्रारुप विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम २६ अन्वये जनतेकडून सूचना व हरकती मागविण्यासाठी प्रसिध्द करण्याबाबत**

**१७.१** सदर प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, ठाणे जिल्हयाच्या भिवंडी तालुक्यातील ५१ गावांच्या (सुधारित ६० गावे) भिवंडी परिसर अधिूसचित क्षेत्रासाठी शासनाने दिनांक १७ मार्च, २००७ च्या अधिसूचने अन्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची विशेष

नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली आहे. प्राधिकरणाने दिनांक २४ डिसेंबर, २००७ च्या ठराव क्र.११३५ अन्वये या अधिसूचित क्षेत्राची विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर केला आणि याबाबतची अधिसूचना / नोटीस दिनांक ७ फेब्रुवारी, २००८ च्या महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द केली. प्राधिकरणाने दिनांक ११ फेब्रुवारी, २०१० च्या पत्रान्वये प्रारुप विकास योजना प्रसिध्द करण्याच्या दोन वर्षांच्या विहित कालावधीमध्ये दिनांक ६ फेब्रुवारी, २०११ पर्यंत एक वर्षाची मुदतवाढ मिळण्याचा प्रस्ताव सादर केला आहे. प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ३० मे, २००८ च्या ठराव क्र.१०९४ नुसार या अधिसूचित क्षेत्राची विकास योजना तयार करण्यासाठी मे.एन.जी.लखनपाल स्ट्रॅटेजिक मॅनेजमेंट सर्व्हिसेस प्रा.लि., गुरगांव यांची सल्लागार म्हणून दिनांक ३१ जुलै, २००८ रोजी नियुक्ती करण्यात आली. सल्लागारांनी तयार केलेले प्रारुप विकास योजनेचे प्रस्ताव व विकास नियंत्रण नियमावली जनतेकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी प्रसिध्द करण्याच्या पुढील कार्यवाहीस प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी सादर केले असल्याचे महानगर आयुक्तांनी सांगितले.

**१७.२** सदर प्रस्तावावर चर्चा करताना प्राधिकरणाचे सदस्य श्री.नबाब मलिक, विधानसभा सदस्य यांनी असे सांगितले की, विकास योजनेचे प्रस्ताव व विकास नियंत्रण नियमावली या दोन्हींच्या अहवालांचा अभ्यास करण्यासाठी पुरेसा अवधी मिळणे आवश्यक आहे. श्री.कपिल पाटील, अध्यक्ष, ठाणे जिल्हा परिषद यांनी असे सांगितले की, सदर प्रारुप विकास योजनेतील घनकचरा व्यवस्थापनासाठीचे प्रस्ताव पुनः तपासणे आवश्यक आहे. तसेच या प्रस्तावित विकास नियंत्रण नियमावलीमुळे या क्षेत्रामधील ग्रामपंचायतींना बांधकाम परवानगीचे अधिकार राहत नाहीत. श्री.टी.सी.बेंजामिन, प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी असे सांगितले की, प्रारुप विकास योजना लवकरात लवकर प्रसिध्द करणे गरजेचे आहे व त्यावरील प्राप्त सूचना/हरकती विचारात घेऊन त्यानुसार अंतिम अहवाल मंजूरीसाठी प्राधिकरणाला शासनाकडे सादर करावा लागेल.

**१७.३** त्यानंतर, मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांच्या परवानगीने सल्लागारानी प्रारुप विकास योजनेचे थोडक्यात सादरीकरण केले. या सादरीकरणानंतर मा.अध्यक्षांनी सदर प्रारुप विकास योजना ही सदस्यांना अभ्यासासाठी पुरेसा कालावधी मिळण्याच्या दृष्टीने प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत सादर करण्याचे निर्देश दिले.

..४४/-

**बाब क्र.१८ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत अंधेरी-घाटकोपर जोडरस्त्यावर आर.बी.कदम मार्ग ते दयासागर, घाटकोपर (पश्चिम) येथील रस्त्यांचे प्रमाणशीर संरेखन बदल करणे.**

**१८.१** या विषयावर चर्चा करताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, अंधेरी घाटकोपर जोडरस्त्यावर आर.बी.कदम मार्ग ते दयासागर घाटकोपर (पश्चिम) येथील लांबीमध्ये प्रमाणशीर संरेखनामध्ये अंशतः बदल करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सदर बदलामुळे २ पक्क्या स्वरुपाच्या इमारती अनुक्रमे राधेश्याम व अगस्तीभुवन वाचविता येऊ शकतात. त्यामुळे प्रकल्पाच्या किंमतीमध्ये सुध्दा बचत होत आंहे. चर्चेच्या अनुषंगाने प्राधिकरणाचे सदस्य श्री.आशिष शेलार, नगरसेवक यांनी प्रश्न उपस्थित केला की, अशा त-हेने बदल केल्यास या पुढील अनेक प्रस्तावांमध्ये अशा त-हेच्या मागण्या पुढे येतील. प्राधिकरणाचे सदस्य श्री.नवाब मलिक, विधानसभा सदस्य यांनी विचारणा केली की, मूळ आखणी करताना याबाबत का विचार करण्यात आली नाही. याबाबत उत्तर देताना महानगर आयुक्त यांनी सांगितले की, सदर आखणी ही Missing Link स्वरुपाची आहे व त्यावर पूर्वी झोपड्या व अतिक्रमणे होती. त्यामुळे किती पक्क्या इमारती जातील, याबाबत अभ्यास करता येऊ शकला नाही. याशिवाय या रस्त्यावर पूर्वी मेट्रो प्रस्तावित नव्हती व ती सर्व पुढील कालावधीत रस्त्याच्या मधोमध प्रस्तावित करण्यात आली. या कारणामुळे सदर बदल करण्याचा प्रस्ताव करणे भाग पडले. श्री.नवाब मलिक यांनी सदर काम पूर्ण व्हावे याबाबत विचारणा केली असता महानगर आयुक्त यांनी या रस्त्याचे काम डिसेंबर, २०१० पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे नमूद केले.

**१८.२** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१२५१ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १७ चे उपकलम (१) व (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरणाद्वारे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'एन' विभागातील अंधेरी-घाटकोपर जोडरस्त्यावरील आर.बी.कदम मार्ग

ते दयासागर पर्यंतच्या भागाचे प्रमाणशिर संरेखन बदलण्यासाठी विद्यमान नियमित रेषेऐवजी नवीन रेषा घोषित करण्यास व महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२६ अन्वये जमीन मालकाच्या परस्पर संमतीने जमीन भूसंपादन करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** याबाबत अंतिम अधिसूचना प्रसिद्ध करण्यास व आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१९ : प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल दिनांक १ डिसेंबर, २००९ ते ३१ जुलै, २०१०.**

**१९.१** महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाकडील असलेल्या अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवालासंबंधी माहिती दिली.

**१९.२** त्यानंतर, दिनांक १ डिसेंबर, २००९ ते दिनांक ३१ जुलै, २०१० या कालावधीत केलेल्या गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद प्राधिकरणाने घेतली.

**बाब क्र.२० : मुंबई महानगर प्रदेश - वास्तुवारसा संरक्षण संस्था व मुंबई महानगर प्रदेश - पर्यावरण सुधारणा संस्था - २००८-०९ चे वार्षिक अहवालांचे सादरीकरण.**

**२०.१** या प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाने मे, १९९६ मध्ये मुंबई महानगर प्रदेश - वास्तुवारसा संरक्षण संस्था व मुंबई महानगर प्रदेश - पर्यावरण सुधारणा संस्था हया दोन स्वतंत्र संस्था स्थापन करण्याचा ठराव करुन हया संस्थांचे संस्थापन, समयलेखे तसेच नियम व नियमावली मंजूर करुन संस्थांच्या नियामक मंडळांवर सदस्यांची नियुक्ती केली आहे.

**२०.२** सदर दोन्ही संस्थांना प्राधिकरणाने प्रत्येकी रु.५ कोटी इतके बिनव्याजी कर्ज दिले असून या कर्जावर येणा-या व्याजातून वरील संस्थांचे कामकाज चालू आहे. वास्तुवारसा संरक्षणाची

माहिती गोळा करणे, संबंधितांना त्याबाबत प्रशिक्षण देणे व त्यांच्यामध्ये वास्तुवारसा संरक्षणाबाबत जागृती निर्माण करणे, वास्तुवारसा असलेल्या इमारती जतन करण्याच्या वा त्या वृध्दी करण्याच्या प्रकल्पांसाठी अर्थसहाय्य उपलब्ध करणे ही वास्तुवारसा संरक्षण संस्थेची उद्दिष्टे आहेत असे महानगर आयुक्त यांनी स्पष्ट केले. तसेच महानगर प्रदेशातील पर्यावरणाचे संरक्षण, सुधारणा आणि संनियंत्रण करण्यात कायदेशिर उपायांसह सर्व सांविधानिक उपाययोजनांद्वारे चालना देणे आणि प्रमुख उद्दिष्टे गाठण्यासाठी त्यावर सहाय्यभूत व अनुषंगिक असतील अशी उद्दिष्टे गाठण्यासाठी सर्व मार्गाचा अवलंब करणे ही पर्यावरण संस्थेची उद्दिष्टे असल्याचे महानगर आयुक्त यांनी स्पष्ट केले.

**२०.३** महानगर आयुक्त यांनी असेही स्पष्ट केले की, वरील संस्थांच्या नियमावलीतील नियम क्र.११.४ अनुसार या संस्थांचे परिक्षित लेखे व वार्षिक अहवाल संस्थेच्या नियामक मंडळाने मंजूर केल्यानंतर प्राधिकरणास माहितीसाठी सादर करणे आवश्यक आहे.

**२०.४** महानगर आयुक्त यांनी बाब टिप्पणीमधील ६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे वर्ष २००८-०९ या कालावधीतील मुं.म.प्र.-वास्तुवारसा संरक्षण संस्थेचे आणि मुं.म.प्र.-पर्यावरण सुधारणा संस्थेचे वार्षिक अहवाल व परिक्षित लेख्यांचे सादरीकरण करुन नोंद घेण्याचे प्रस्तावित केले.

**२०.५** बाब टिप्पणीमधील ६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे वर्ष २००८-०९ या कलावधीतील मुं.म.प्र.-वास्तुवारसा संरक्षण संस्थेचे आणि मुं.म.प्र.-पर्यावरण सुधारणा संस्थेचे वार्षिक अहवाल व परिक्षित लेख्यांची प्राधिकरणाने नोंद घेतली.

**२०.६** या विषयावर चर्चा करताना प्राधिकरणाचे सदस्य श्री.आशिष शेलार, नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी 'वॉटसन हॉटेल' या इमारतीची महत्वाची माहिती देऊन त्याचे पुनरुज्जीवन करण्यासाठी प्राधिकरणाने मदत करावी असे सूचित केले. या मुद्दयावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सदर इमारत ही खाजगी मालकीची असल्याने व इमारतीत अनेक व्यावसायिक भाडेकरु असल्याने तसेच सदर इमारत मोडकळीच्या स्थितीत असल्याने इमारतीच्या पुनरुज्जीवन संदर्भात अनेक बाबी विचारात घेणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. चर्चेनंतर, मा.मुख्यमंत्री व

..४७/-

अध्यक्ष, प्राधिकरण यांनी सदर इमारतीच्या सद्यस्थितीचा अहवाल तयार करुन पुढील कार्यवाही निश्चित करण्याकरीता प्राधिकरणास सादर करावा अशी सूचना दिली.

**पटल बाब क्र.१ : मुंबई महानगर प्रदेशात हरित उपक्रमांचा कार्यक्रम राबविणे.**

या प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सन २०१० मध्ये मा.मुख्यमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली प्राधिकरणाने राज्यस्तरावर इको-हाऊसिंग तसेच हरित उपक्रमांतर्गत वृक्षारोपण व पावसाळी पाण्याचे संवर्धन (Rain Water Harvesting) अशा दोन विषयासंबंधी परिषद घेतली होती. सदर परिषदेला महाराष्ट्रामधील सर्व नागरी स्थानिक संस्थांचे प्रतिनिधी, जिल्हास्तरीय यंत्रणा, इको-हाऊसिंगवरील तज्ञ, पर्यावरण तज्ञ / संस्था व या क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या संस्था व व्यक्ती उपस्थित होते. काही संस्था व वन विभागाने वृक्षरोपणासंदर्भात त्यांनी स्वतः हाती घेतलेल्या प्रकल्पाबाबतची माहिती दिली. तसेच काही महाविद्यालये व अशासकीय संस्था (NGOs) यांच्यामार्फत राबविल्या जाणा-या हरित उपक्रमांतर्गत कार्यक्रम व त्यामधील येणा-या अडचणींबाबतची माहिती दिली.

महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, पर्यावरणामध्ये सुधारणा करण्यासाठी शासनाने थेट हस्तक्षेप करणे आवश्यक असल्याने मुंबई महानगर प्रदेशामध्ये सुमारे एक कोटी वृक्षांची लागवड करणे योग्य ठरेल व या उपक्रमासाठी लागणा-या निधीचे अंदाजपत्रक तयार करुन प्राधिकरणाच्या पुढील बैठकीमध्ये या वर्षीच्या अर्थसंकल्पीय तरतूदींचे पुनर्निर्धारण (re-appropriation) करताना याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात येईल.

वरील बाब टिप्पणीची नोंद प्राधिकरणाने घेतली.

**पटल बाब क्र.२ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील अधिकारी व कर्मचा-यांना सन २००९-१० या वित्तीय वर्षासाठी सानुग्रह अनुदान मंजूर करणेबाबत.**

प्राधिकरणातील अधिकारी आणि कर्मचारी यांना रु.१५,०००/- सानुग्रह अनुदान द्यावे अशी विनंती प्राधिकरणातील कर्मचारी व मागासवर्गीय संघटनांनी केलेली आहे. तसेच त्यांनी सिडकोला

रु.१२,५०० सानुग्रह अनुदान मिळत असल्याचाही उल्लेख केलेला आहे. या अनुषंगाने माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सन २००८-२००९ मध्ये प्राधिकरणातील अधिकारी आणि कर्मचारी यांना रु.६,०००/- सानुग्रह अनुदान दिले होते. त्यासाठी प्राधिकरणाला रु.३३ लाख भार पडला होता. जर सानुग्रह अनुदान सन २००९-१० साठी त्यांच्या मागणीप्रमाणे रु.१२,५००/- दिले तर प्राधिकरणावर रु.७५ लाखाचा आर्थिक भार पडेल आणि रु.१५,०००/- दिले तर रु.९० लाखाचा आर्थिक भार पडेल. या सर्व बाबींचा विचार करुन प्राधिकरणातील अधिकारी व कर्मचारी यांना सानुग्रह अनुदान मंजूर करावे.

प्राधिकरणातील अधिकारी व कर्मचा-यांना सन २००९-१० या वित्तीय वर्षासाठी सानुग्रह अनुदान मंजूर करण्याच्या संदर्भात चर्चा करताना प्राधिकरणाचे सदस्य श्री.नवाब मलिक, विधानसभा सदस्य यांनी ८.३३% या दराप्रमाणे सानुग्रह अनुदान मंजूर करण्याचा प्राधिकरणाने विचार करावा असे मत व्यक्त केले. तसेच प्राधिकरणाचे सदस्य श्री.प्रशांत ठाकूर, विधानसभा सदस्य यांनी प्राधिकरणाच्या अधिकारी व कर्मचा-यांना एक महिन्याचे वेतन सानुग्रह अनुदान म्हणून मंजूर करण्याचे मत व्यक्त केले. या संदर्भात सविस्तर चर्चा झाल्यानंतर प्राधिकरणाचे अधिकारी व कर्मचा-यांना सन २००९-१० या वित्तीय वर्षासाठी सानुग्रह अनुदान मंजूर करण्याचे अधिकार मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांना देण्यात यावे असे ठरले.

वरील निर्णयानुसार, महानगर आयुक्त यांनी सानुग्रह अनुदान मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांना सादर करावा.

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

********************

<u>(जोडपत्रे - १, २, ३ व ४)</u>

जोडपत्र - १

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची १२७ वी बैठक

दिनांक : २६ ऑगस्ट, २०१०

### : ठ रा व :

"श्री.पुष्पकांत म्हात्रे, माजी अध्यक्ष, स्थायी समिती, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे दिनांक २२ एप्रिल, २०१० रोजी निधन झाले. श्री.म्हात्रे हे दिनांक १ मार्च, १९७५ ते दिनांक ७ जानेवारी, १९७९ या कालावधीत नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका या नात्याने प्राधिकरणाचे सदस्य होते. तसेच दिनांक १० एप्रिल, १९८७ ते दिनांक ७ एप्रिल, १९८८ आणि दिनांक १२ एप्रिल, १९९३ ते दिनांक ९ एप्रिल, १९९४ या कालावधीत अध्यक्ष, स्थायी समिती, बृहन्मुंबई महानगरपालिका या नात्याने प्राधिकरणाचे सदस्य होते. या काळात श्री.म्हात्रे यांनी प्राधिकरणाच्या कार्यात व कामकाजात आस्थेने भाग घेतला होता. हे प्राधिकरण, त्यांच्या दुःखद निधनाने फार मोठी हानी झाल्याचे अभिलिखित करीत आहे.

या ठरावाची प्रत दिवंगत श्री.म्हात्रे यांचे कुटुंबियांकडे पाठवून त्यांच्या दुःखात प्राधिकरण सहभागी आहे असे कळवावे."

**********

जोडपत्र - २

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची १२७ वी बैठक

दिनांक : २६ ऑगस्ट, २०१०

## : ठ रा व :

"श्री.सदाशिवराव तिनईकर, माजी सचिव, गृहनिर्माण विभाग व माजी महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे दिनांक २२ मे, २०१० रोजी निधन झाले. श्री.तिनईकर हे दिनांक २० मे, १९८३ ते दिनांक २५ जून, १९८४ या कालावधीत सचिव, गृहनिर्माण विभाग या नात्याने तसेच दिनांक २५ जुलै, १९८६ ते दिनांक ३० एप्रिल, १९९० या कालावधीत महापालिका आयुक्त या नात्याने प्राधिकरणाचे सदस्य होते. या काळात श्री.तिनईकर यांनी प्राधिकरणाच्या कार्यात व कामकाजात आस्थेने भाग घेतला होता. हे प्राधिकरण, त्यांच्या दुःखद निधनाने फार मोठी हानी झाल्याचे अभिलिखित करीत आहे.

या ठरावाची प्रत दिवंगत श्री.तिनईकर यांचे कुटुंबियांकडे पाठवून त्यांच्या दुःखात प्राधिकरण सहभागी आहे असे कळवावे."

**********

<u>जोडपत्र - ३</u>

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची १२७ वी बैठक

दिनांक : २६ ऑगस्ट, २०१०

## : ठ रा व :

"श्री.नरेंद्र तिडके, माजी उद्योग मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे दिनांक १६ जून, २०१० रोजी निधन झाले. श्री.तिडके हे दिनांक १ मार्च, १९७५ ते दिनांक ८ फेब्रुवारी, १९७७ तसेच दिनांक १५ ऑक्टोबर, १९८२ ते दिनांक १ फेब्रुवारी, १९८३ या कालावधीत उद्योग मंत्री या नात्याने प्राधिकरणाचे सदस्य होते. या काळात श्री.तिडके यांनी प्राधिकरणाच्या कार्यात व कामकाजात आस्थेने भाग घेतला होता. हे प्राधिकरण, त्यांच्या दुःखद निधनाने फार मोठी हानी झाल्याचे अभिलिखित करीत आहे.

या ठरावाची प्रत दिवंगत श्री.तिडके यांचे कुटुंबियांकडे पाठवून त्यांच्या दुःखात प्राधिकरण सहभागी आहे असे कळवावे."

**********

जोडपत्र - ४

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची १२७ वी बैठक

दिनांक : २६ ऑगस्ट, २०१०

## : ठ रा व :

"श्री.मधुकरराव चौधरी, माजी वित्त मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे दिनांक ८ जुलै, २०१० रोजी निधन झाले. श्री.चौधरी हे दिनांक १ मार्च, १९७५ ते दिनांक १० फेब्रुवारी, १९७६ या कालावधीत वित्त मंत्री या नात्याने प्राधिकरणाचे सदस्य होते. या काळात श्री.चौधरी यांनी प्राधिकरणाच्या कार्यात व कामकाजात आस्थेने भाग घेतला होता. हे प्राधिकरण, त्यांच्या दुःखद निधनाने फार मोठी हानी झाल्याचे अभिलिखित करीत आहे.

या ठरावाची प्रत दिवंगत श्री.चौधरी यांचे कुटुंबियांकडे पाठवून त्यांच्या दुःखात प्राधिकरण सहभागी आहे असे कळवावे."

**********